ग्रं. सं. ठाणे ९८८५
किरकोळ
९२

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
किरकोळ

लेखक वि. गो. लिमये नरगुंदकर

सन
१८८५

पुस्तकाचें नांव संसारदर्पण

ळय क्रमांक
६४

६४

किरकोळ

~~सं. २०२~~
~~मि ३३~~
विशेष

१८८५ अग

अनु - ६४

# SAMSARDARPANA

OR

# MIRROR OF FAMILY LIFE.

[CONDUCT OF MEMBERS IN A FAMILY WITH INSTRUCTIVE STORIES FOR THEIR GUIDANCE IN PROSE AND POETRY.]

COMPILED BY

**VINAYAK G. NARGUNDAKAR**

AUTHOR OF

STRISHIKSHANAMALA, KUTUMBPRAKASH, HISTORY OF COORG AND OTHER WORKS.

Bombay:

PRINTED AT THE NATIVE OPINION PRESS.

*Price Ten Annas.*

( हिंदुस्थान सरकारचा सन १८६७ चा आक्ट २५
प्रमाणें रजिष्टर करून ग्रंथकर्त्यानें सर्व प्रकारचे
हक्क आपले स्वाधीन ठेविले आहेत. )

विद्येविषयीं परमरसिक व मर्मज्ञ ...ला,

श्री. विनायकराव गणेश कि...

जाहगीरदार.

राहणार इन्दूर ( छावणी. )

प्रांत माळवा.

यांस,

ते स्त्रीशिक्षण व स्वदेशसुधारणा

होण्या करितां जे निरपेक्ष श्रम

घेतात हें जाणून,

साश्चर्य मनोभावानें,

अत्यंत सन्मान व कृतज्ञतापूर्वक,

**हा ग्रंथ**

कर्त्यानें

**नजर केला असे.**

विनायकराव गोविंद लिमये नरगुंदकर,

ग्रंथकार.

# प्रस्तावना.

प्राचीन काळीं स्त्रियांस विद्या शिकविण्याची चाल होती व त्या ज्ञानसंपन्न होत्या असें पुरातन इतिहासांवरून निर्विवाद सिद्ध होतें, परंतु या भरतखंडावर अनेक वेळां राज्यक्रांतीचीं महत् संकटें गुदरल्यामुळें स्त्रीशिक्षणाची चाल अगदीं मागें पडली व ती आतां आपले लोकांस इतकी परकीय झाली आहे कीं त्यांनां आतां स्त्रियांस विद्या शिकवावी किंवा नाहीं, याचीच भ्रांती आहे. आपले देशभगिनींचें सुदैवानें ब्रिटिश सरकारचें राज्य या देशावर सुरू झाल्यापासून त्यांच्या मदतीनें व कित्येक विद्वान व पुढारी लोकांच्या साह्यानें स्त्रीशिक्षणाची पुनः सुरवात होऊन आलीकडे तर तें बरेंच ऊर्जित दशेस चढत चाललें आहे हें पाहून आम्हांला आनंद वाटतो.

आज सूक्ष्म दृष्टीनें विचार करून पाहिलें असतां स्त्रियांस योग्य शिक्षण देऊन त्यांस ज्ञानसंपन्न करण्याचे उपाय जरी चालले आहेत, तरी त्यांस वाचावयास योग्य अशा विषयांवर ग्रंथ अद्यापि कोणीं तयार केलेले पहाण्यांत आले नाहींत म्हणून ही उणीव दूर करण्याकरितां

न व ज्ञानाभिलाषी देशभगिनींच्या सत्कालक्षे- र्थ सन्मार्ग दर्शक व मनोरंजक उपयुक्त विषयांचा हा ग्रंथ आम्हीं तयार केला आहे. यांत फारच उ- युक्त विषय असून सर्व स्त्रीपुरुषांस या पासून एक प्रकारचा चांगला फायदा होईल. तस्मात ज्ञानाभि- लाषी सुजनांनीं योग्य आश्रय देऊन आपल्या स्त्री- वर्गाचें हित संपादन करावें.

स्त्रियांस चांगल्या प्रकारचें शिक्षण असावें अशा बद्दल पुष्कळ प्रकारच्या खटपटी सुरू आहेत, परंतु खरोखर कोणच्या नडी या स्त्रिशिक्षणांस नडतात हें कोणीही समंजस मनुष्य पाहत नाहीं. आलीकडे बऱ्याच ठिकाणीं स्त्रियांस शिक्षण मिळत आहे व बहुतकरून मोठमोठ्या शहरीं हें काम जारीने सुरू आहे, परंतु कित्येक संस्थानांत त्याचा मुळींच अभाव आहेसा दिसतो. याचें कारण असें दिसून येतें कीं, वरिष्टांस याबदलची मुळींच असावी तशी काळजी नाहीं. तशांतून कोठें थोडेसें सुरू आहे तेथें असावी तशी पुस्तकें वाचण्यास मिळत नाहींत. कदाचित मिळा ल्यास खर्चाच्या काटकसरीनें सवंग जीं मिळती ल ती घेऊन अभ्यास सूरूं करावयाचा असें कित्ये क ठिकाणीं आम्हीं पाहतों. लाखो रुपये व्यर्थ दगड मातींत खर्च केले तरी पत्करले, परंतु विद्ये-

सं. ब्रि २०२



कडे मात्र काटकसर करतात हें पाहून आम्हांस फा, वाईट वाटतें.

आह्मांस आमच्या कित्येक विद्वान मित्रांनीं सांगितल्यावरून आह्मीं हा "संसारदर्पण" या नावाचा ग्रंथ तयार केला आहे. यांत पुष्कळ प्रकारचे उपयुक्त विषय असून प्रत्येक कुटुंबांतील स्त्रीपुरुषांस या ग्रंथापासून फारच फायदा होणारा आहे तर सर्व स्वदेश बांधवांनीं हा ग्रंथ संग्रहीं बाळगून आपल्या स्त्रिजनाचें हित संपादन करावें. असें आह्मीं सर्वत्रांस विनयपुर्वक कळवितों.

या ग्रंथाचे कामीं श्रीमंत विनायकराव गणेश किबे मुकाम इंदूर यांणीं पुष्कळ प्रकारची मदत केली तिजबद्दल आम्हीं त्यांचे फार फार आभारी आहोंत.

रावसाहेब किबे हे विद्या वृद्धीचे कामीं फार काळजीनें झटतात. यांचेप्रमाणे देश सुधारणेची आमचे देशांतील सर्व श्रीमान व संस्थानी लोक जर काळजी घेतील व यथा शक्ति मदत करतील तर देशाचा ऊर्जितकाळ त्वरित येईल व सर्व लोक सुखी होतील. इश्वरकरो व त्यांचे अंतःकरणांत रावसाहेब किब्यांप्रमाणें देशाभिमान जागृत होवो.

या ग्रंथासंबंधी सर्व माहिती आमच्या, मित्रांनीं श्रीमंत किबे साहेब यांस सांगितली व आश्रय

ळावा अशी विनंती केली ती श्रीमंतानीं मान्य केली हें पाहून आम्हांस फार फार आनंद वाटतो.

या ग्रंथांतील सर्व पद्यें संगीताचे चालीवर ताल सुरासह दिलीं आहेत.

VINAYEK GOVIND LIMAYE
Author.

मुकाम मुंबई, ता. २५ माहे मार्च सन १८८५ इ.

खालीं नमूद केलेल्या सद्गृहस्थांनीं ?ा,
मला आपला उदार आश्रय
दिल्यामुळें मी त्यांचा फार
फार आभारी आहें.

श्रीमन्महाराज कृष्णराव बाबा साहेब पवार राजेसाहेब सं. देवास, प्रांत माळवा. ( बडी पाति. )

श्रीमन्महाराज. पतंगशा राजेसाहेब संस्थानजव्हार, जिल्हा ठाणें.

श्रीमन्महाराज व्यंकटराव बाळासाहेब घोरपडे. संस्थान मुधोळ.

श्रीमंत बाळासाहेब. पंतअमात्य बावडेकर संस्थान बावडा, इलाखा कोल्हापूर.

श्रीमंत बापुसाहेब कुरुंदवाडकर, संस्थान कुरुंदवाड.

श्रीमंत रावबाहदुर विनायकराव रंगराव ऊर्फ बाबासाहेब पुरंदरे कारभारी, संस्थान जंजिरा (मुरुड) हबसाण.

VINAYEK GOVIND LIMAYE,
Author.

## चमत्कारीक व मनोरंजक ग्रंथ.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| १ स्त्रीशिक्षण ज्ञानमाला.... ... | ० | १२ | ० |
| २ संसारदर्पण .... .... ... | ० | १० | ० |
| ३ कुटुंब प्रकाश पूर्वभाग.... .... | ० | १२ | ० |
| ४ डोहळे जेवण व हळदकुंकु. .... | ० | ८ | ० |
| ५ जारिणीकृत्यादर्श प्रहसन .... | ० | ४ | ० |
| ६ कुर्ग प्रांताचा खरा इतिहास | ० | ६ | ० |
| ७ बेळगांव जिल्ह्याचा भूगोल .... | ० | २ | ० |
| ८ अंकगणितसार भाग पहिला.... | ० | २ | ० |
| ९ उजळणीचें नवीन तऱ्हेचें पुस्तक | ० | १ | ६ |
| १० महाराष्ट्रदेशाचा इतिहास .... | ० | १ | ० |
| १२ तोंडचे हिशेब भाग पहिला.... | ० | १ | ० |
| १२ „ „ भाग दुसरा. ... | ० | १ | ३ |
| १३ प्रतापराव नाटक .... .... | १ | ० | २ |
| १४ अबला जानकी चातुर्य. .... | ० | १२ | २ |
| १५ जपानचें वर्णन .... | ० | ८ | १ |
| १६ मुलीची सासरीं वागवणूक.... | ० | ४ | १ |

मराठी ग्रंथ सं... नं० २२८ ठाणें...

# संसारदर्पण.

## प्रकरण १ लें.

### स्त्रियांचें शिक्षण व पातिव्रत्य.

(पद.) राग सारंग—ताल धुमाळी.

(हरिची भगिनी ह्मणे सुभद्रा.) या चालीवर.

सुशील आपुल्या ललना शिकवा विनती ही कि तुह्मांला भवसागरिं त्या सौख्य भोगुनी तारिति आपणासह पतिला ॥ ध्रु० ॥ स्वातंत्र्यातें इच्छिति जरि त्या योग्य असे तें मिळण्याला । बाध काय तो येइल नकळे स्त्रीशिक्षण तें देण्याला ॥

स्त्रियांना शिक्षण मिळालें ह्मणजे त्या स्वतंत्र होण्याची इच्छा करतील, व त्यांना स्वातंत्र्य मिळालें असतां आपल्या सुखांत कमतरता येईल, या कारणा करितां स्त्रियांना शिक्षण देऊं नये असा कित्येकांचा आक्षेप आहे. स्त्रिया सुशिक्षित झाल्या ह्मणजे त्या स्वतंत्र होऊं इच्छितील हें अगदीं साहजिक आहे, पण योग्य अशी स्वतंत्रता त्यांस मिळूं नये असें कोण शहाणा मनुष्य प्रतिपादन करील? हलीं कित्येक ठिकाणीं दृष्टीस पडणाऱ्या सासुरवासझालेल्या स्त्रियांची गां-

..क कमी होईल यांत तिळमात्र ही शंका नाहीं. निर्दय सासूचे कठोर शब्द, बाहेर ख्याली व स्वच्छंद नवऱ्याचें वर्तन, कजाग नणदांचीं घालून पाडून बोलणीं हीं हल्लीं कित्येक ठिकाणीं सासुरवासिणींस मुकाट्यानें सहन करावीं लागत आहेत तीं तशा रीतीनें सहन न करतां त्या या जाचांतून सुटका होण्याची इच्छा करतील.

या लहान मुलींना पांढऱ्या पायाच्या, फुटक्या कपाळाच्या, ह्मणून जे कटु शब्द बोलण्यांत येतात व त्यांचा अखंड छल होऊन त्यांच्या कपाळीं धुण्याची मोट व पाण्याची घागर जी लागलेली असते, अशी स्थिति सुटून कांहीं निराळा प्रकार दृष्टीस पडेल. पतिराजांनीं आपल्या मर्जीस जसें येईल तसें वागावें व एक बायको घरांत लक्ष्मी सारखी नांदत असतां आणखी भरतीला पाहिजे असल्यास दहा पांच अंगवस्त्रें काखेंत बाळगावीं, व इतकें करून ही बिचाऱ्या नावडत्या स्त्रीनें कोणापाशीं ब्र सुद्धां काढण्याची सोय नाहीं ! अशा प्रकारें तुर्कस्थानची सुलतानी गाजविण्यास ज्या कित्येक आपलपोटे लोकांस हल्लीं सवड मिळत आहे, ती स्त्रिया शहाण्या झाल्या असतां मिळणार नाहीं हें भविष्य आह्मी कधींच करून चुकलों आहों; परंतु हल्लीं आमच्या कित्येक पुरुषांना ज्ञान जर अमोलिक वस्तु वाटते, तें नसेल तर जर पुरुष पशु ठरतो, त्या

हीं पुस्तकें खालीं सही करणाराकडे जमखिंडी, येथें श्री. तात्यासाहेब रास्ते यांचे वाड्यांत, व मुंबईंत इंदुप्रकाश, नेटीव ओपिनियन, जगदीश्वर छापखाना ह्या ठिकाणीं रोख किंमत व टपाल हशील पाठविलें असतां मिळतील.

विनायकराव गोविंद लिमये.

मराठी ग्रंथ ... ठाणे.

करितां काय वाटेल तें सोसण्यस जर तो तयार असतो, तर तेंच ज्ञान स्त्रियांस नीच व व्यभिचारी करून सोडी, हें ह्मणणें स्वभावविरुद्ध आहे. असें जो ह्मणतो त्यास विद्येचें खरें महत्व, तिचे परिणाम, तिची शक्ति कळलीच नाहीं असें आह्मी समजतों. आह्मांस असल्या क्षुद्र बुद्धीच्या आपणांस विद्वान ह्मणविणाऱ्या लोकांची कींव येते ! स्त्रियांस केवळ भोगांगना समजून त्यांस तसें वागविणें, व त्यांस तसें वागविण्याबद्दल आग्रह धरणें हीं अति नीच मनुष्यांचीं कामें होत. विद्येपासून स्त्रिया भ्रष्ट होतील हें पोंकळ मत गृहीत करून ज्यां पासून आपली उत्पति, ज्यांपासूनच आपली वृद्धि, त्यांपासून आपणांस सौख्य व ऊन्नति झाली तर आपली होणार असें कोणी ह्मणणारा असेल तर त्यास जन्म देऊन ब्रह्मदेव चुकला असें ह्मटलें पाहिजे. भू माता समजून तिच्या उन्नत्यर्थ व तिजला स्वातंत्र्य प्राप्त व्हावें ह्मणून आमचे रात्रं-दिवस श्रम चालू आहेत. स्त्रियेनें आपल्या विवाहित पतीशीं व एकट्या त्याच्याशींच आजन्म प्रतरणा न करितां इमानानें, प्रमाणिकपणानें व एकनिष्ठेनें परपुरुषाचे ठायीं मनसुद्धां न जाऊं देतां रहावें. मन सुद्धां न जाऊं देतां असें जें आह्मीं ह्मटलें आहे त्याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा कीं, कोणताही व्यवहार इतरां बरोबर तिनें करावयाचा नाहीं. कारण या कलियुगांत वाचिक व मानसिक दोष धरले जात

नाहींत. कायिक दोष मात्र धरतात. वाचिक व मानसिक दोष जर धरले, तर मग सगळ्या हिंदुस्थानांत आमच्या स्त्रियांत एकही पतिव्रता खास मिळणार नाहीं, मग शिक्षणानें ज्यास्ती काय व्हावयाचें आहे ? तर तशी दांडगाई प्रतिपक्ष कबूल करणार नाहींच. आलीकडे एवढें मत कायम राहिलें आहे कीं, जोंपर्यंत एकाद्या स्त्रीचा प्रत्यक्ष संबंध परपुरुषाबरोबर झालेला नाहीं, तों पर्यंत ती पूर्ण पतिव्रता. असें पातिव्रत्य आमच्या स्त्रियांत पुष्कळ आहे. तें या शिक्षणामुळें कमी होऊन पुढें अगदीं नाहींसें होईल, असें नाहीं. सृष्टयुत्पत्ती नंतर जो कांहीं काळ गेला त्यांत एका पुरुषाशीं व्यवहार असावा अशी कल्पनाच नव्हती. आपलीं पुराणें ज्यांनीं वाचिलीं असतील, निदान एकाग्र चित्तानें ऐकिलीं असतील त्यांस, व इतर रानटी लोकांचे व्यवहार व रीति ज्यांनीं ऐकिल्या असतील,त्यांस माहीत असेलच कीं,त्यावेळेस फक्त पुरुष व स्त्री एवढाच भेद मानीत असत. पण हा सत्य युगांला प्रकार श्वेतकेतु ह्मणून एक ऋषि होता त्यानें बंद केला. पुढें संमतीनें वरील प्रकार होत असे. नंतर स्त्रिया अनेकपतींसवें राहूं लागल्या व अजून हिमालयाच्या पायथ्याशीं कोणी लोक राहतात, त्यां

मध्यें अनेक पतींची वहिवाट आहे. नेर लोकांत ज्ञा, झालेले घरांत जितके पुरुष असतील तितक्यांशीं व वाटेल तर इतरांशीं व्यवहार संबंध तिकडील स्त्रिया करितात. आमच्यांत जे आठ प्रकारचे विवाह सांगितले आहेत व जे बारा प्रकारचे पुत्रोत्पत्तीचे मार्ग सांगितले आहेत, ज्यांचे फक्त उल्लेखही ओंगळ वाटतील, त्यांवरून, आमच्या लोकांतही पूर्वीं त्याप्रकारची स्थिति होती असें दिसतें. अशीं जीं अनेकपुराणांतून व इतर कवींच्या ग्रंथांतून उदाहरणें आपण पाहतों त्यांवरून वरची पातिव्रत्याची साधी व्याख्या केली आहे.

प्रकरण १ लें समाप्त.

# प्रकरण २ रें.

---

## स्त्रीपुरुषांची तुलना.

(पद) राग झिंजोटी—ताल दादरा.

(सुंदरमुख तुंदिलतनु.) या चालीवर.

विद्येविण मनुष्यपणा मानवां नसे ॥
कळुनि तत्व पूर्ण नेत्र झांकितां कसे ॥ धु०॥
सत्य असें कृत्य तुह्मां स्तुस्य तें नसे ।
त्यजुनि धूर्तवर्तनांसि रास्त जें दिसे ।
तेंचि करा व्यर्थ काय बोलणें असें ॥ वि० ॥
विविध विषय कठिण लिपी अमित ही कला ।
दीर्घ परिश्रम करुनि स्वयें शीकलां ।
परि तुमच्या कुलिन असुनि त्याच गृहिणिला ।
गाढतमीं ढकलुनि कां देतसां असे ॥ वि० ॥

स्त्रिया पुरुषांपेक्षां ज्यास्त उल्हास वृत्तीच्या असतात हें सर्वांस माहीत आहेच. स्त्रियांस अल्प गोष्ट आनंदास कारण होते; ज्या गोष्टींपासून पुरुष जातीस आनंद व दुःख मुळींच होत नाहीं, त्याच स्त्रिजातीस मोठ्या आनंददायक किंवा दुःखदायक होतात. अशीं उदाहरणें आमच्या वाचकांस शेंकडों माहीत असतील, व हा प्रकार नित्यशः आपण पहातों व ऐकतोंही. पुरुषानें एखादा जिन्नस स्त्रियेस दिला, मग (तो किंवाही हलक्या किंमतीचा

असो) अथवा पुरुष एक दोन शब्द प्रीतीनें बोलला, तर ती आनंदभरीत होऊन जाते. स्त्रियांच्या शरीरांतील रक्त फार शुद्ध असतें; ह्मणजे तें “ पिंजून धनकून साफ केलेल्या कापसासारखें ” आहे; व त्यांच्या देहाचे तंतु अगदीं बारीक असून फारच नाजूक असे आहेत. ह्मणून स्त्रिया जास्त उल्हासवृत्तीच्या असतात, हें निःसंशय आहे. त्याप्रमाणेंच पुरुष जसें मोठ्या गंभीर व शांतस्वभावानें कोणतेंही सुखदुःख भोगील तसें स्त्रीचे हातून होणार नाहीं.

पुरुषांस गांभीर्य व स्त्रियांस उल्हासवृत्ति हे नैसर्गिक गुण ईश्वरदत्तच आहेत. जर स्त्री प्रत्येक कामांत आपल्या उल्हासवृत्तीचा हेका धरून पुरुषाच्या गांभीर्याचा मुळींच उपयोग करून घेणार नाहीं तर ती त्या योगानें छचोर होईल; व त्याप्रमाणें पुरुष जर स्त्रीचे गुणांचा उपयोग न करितां वागेल तर तो कपटी होण्याचा संभव आहे. स्त्री व पुरुष यांचीं मनें केवळ परस्परांच्या उपयोगाचींच आहेत. स्त्रीनें आपल्या आनंदवृत्तीनें संसारसंरक्षणाच्या कामीं पुरुषास होणाऱ्या अनेक संकटांपासून उत्पन्न झालेल्या श्रमाचा आपल्या मधुर भाषणांनीं परिहार करावा, हा स्त्रीचा मुख्य धर्म होय. अशा रीतीनें वागणाऱ्या सुंदर जोडप्यासारखा जगतांत दुसरा सुखी कोणीही नाहीं असें समजलें पाहिजे; अशा कुटुंबांत जो

हींत. कायिक दोष मात्र धरतात. वाचिक व मानसिक दोष जर धरले, तर मग सगळ्या हिंदुस्थानांत आमच्या स्त्रियांत एकही पतिव्रता खास मिळणार नाहीं, मग शिक्षणानें ज्यास्ती काय व्हावयाचें आहे ! तर तशी दांडगाई प्रतिपक्ष कबूल करणार नाहींच. आलीकडे एवढें मत कायम राहिलें आहे कीं, जोंपर्यंत एकाद्या स्त्रीचा प्रत्यक्ष संबंध परपुरुषाबरोबर झालेला नाहीं, तों पर्यंत ती पूर्ण पतिव्रता. असें पातिव्रत्य आमच्या स्त्रियांत पुष्कळ आहे. तें या शिक्षणामुळें कमी होऊन पुढें अगदीं नाहींसें होईल, असें नाहीं. सृष्टयुत्पत्ती नंतर जो कांहीं काळ गेला त्यांत एका पुरुषाशीं व्यवहार असावा अशी कल्पनाच नव्हती. आपलीं पुराणें ज्यांनीं वाचिलीं असतील, निदान एकाग्र चित्तानें ऐकिलीं असतील त्यांस, व इतर रानटी लोकांचे व्यवहार व रीति ज्यांनीं ऐकिल्या असतील,त्यांस माहीत असेलच कीं,त्यावेळेस फक्त पुरुष व स्त्री एवढाच भेद मानीत असत. पण हा सत्य युगांला प्रकार श्वेतकेतु ह्मणून एक ऋषि होता त्यानें बंद केला. पुढें संमतीनें वरील प्रकार होत असे. नंतर स्त्रिया अनेकपतींसवें राहूं लागल्या व अजून हिमालयाच्या पायथ्याशीं कोणी लोक राहतात, त्यां

मध्यें अनेक पतींची वहिवाट आहे. नेर लोकांत ल्ग्न झालेले घरांत जितके पुरुष असतील तितक्यांशीं व वाटेल तर इतरांशीं व्यवहार संबंध तिकडील स्त्रिया करितात. आमच्यांत जे आठ प्रकारचे विवाह सांगितले आहेत व जे बारा प्रकारचे पुत्रोत्पत्तीचे मार्ग सांगितले आहेत, ज्यांचे फक्त उल्लेखही ओंगळ वाटतील, त्यांवरून, आमच्या लोकांतही पूर्वी त्याप्रकारची स्थिति होती असें दिसतें. अशीं जीं अनेकपुराणांतून व इतर कवींच्या ग्रंथांतून उदाहरणें आपण पाहतों त्यांवरून वरची पातिव्रत्याची साधी व्याख्या केली आहे.

प्रकरण १ लें समाप्त.

# प्रकरण २ रें.

---

## स्त्रीपुरुषांची तुलना.

(पद) राग झिंझोटी—ताल दादरा.

(सुंदरमुख तुंदिलतनु.) या चालीवर.

विद्येविण मनुष्यपणा मानवां नसे ॥
कळुनि तत्व पूर्ण नेत्र झांकितां कसे ॥ ध्रु०॥
सत्य असें कृत्य तुह्मां स्तुत्य तें नसे ।
त्यजुनि धूर्तवर्तनासि रास्त जें दिसे ।
तेंचि करा व्यर्थ काय बोलणें असें ॥ वि० ॥
विविध विषय कठिण लिपी अमित ही कला ।
दीर्घ परिश्रम करुनि स्वयें शीकलां ।
परि तुमच्या कुलिन असुनि त्याच गृहिणिला ।
गाढतमीं ढकलुनि कां देतसां असे ॥ वि० ॥

स्त्रिया पुरुषांपेक्षां ज्यास्त उल्हास वृत्तीच्या असतात हें सर्वांस माहीत आहेच. स्त्रियांस अल्प गोष्ट आनंदास कारण होते; ज्या गोष्टींपासून पुरुष जातीस आनंद व दुःख मुळींच होत नाहीं, त्याच स्त्रिजातीस मोठ्या आनंददायक किंवा दुःखदायक होतात. अशीं उदाहरणें आमच्या वाचकांस शेंकडों माहीत असतील, व हा प्रकार नित्यशः आपण पहातों व ऐकतोंही. पुरुषानें एखादा जिन्नस स्त्रियेस दिला, मग (तो किंवाही हलक्या किंमतीचा

असो) अथवा पुरुष एक दोन शब्द प्रीतीनें बोलला, तर ती आनंदभरीत होऊन जाते. स्त्रियांच्या शरीरांतील रक्त फार शुद्ध असतें; ह्मणजे तें "पिंजून धनकून साफ केलेल्या कापसासारखें" आहे; व त्यांच्या देहाचे तंतु अगदीं बारीक असून फारच नाजूक असे आहेत. ह्मणून स्त्रिया जात्या उल्हासवृत्तीच्या असतात, हें निःसंशय आहे. त्याप्रमाणेंच पुरुष जसें मोठ्या गंभीर व शांतस्वभावानें कोणतेंही सुखदुःख भोगील तसें स्त्रीचे हातून होणार नाहीं.

पुरुषांस गांभीर्य व स्त्रियांस उल्हासवृत्ति हे नैसर्गिक गुण ईश्वरदत्तच आहेत. जर स्त्री प्रत्येक कामांत आपल्या उल्हासवृत्तीचा हेका धरून पुरुषाच्या गांभीर्याचा मुळींच उपयोग करून घेणार नाहीं तर ती त्या योगानें छचोर होईल; व त्याप्रमाणें पुरुष जर स्त्रीचे गुणांचा उपयोग न करितां वागेल तर तो कपटी होण्याचा संभव आहे. स्त्री व पुरुष यांचीं मनें केवळ परस्परांच्या उपयोगाचींच आहेत. स्त्रीनें आपल्या आनंदवृत्तीनें संसारसंरक्षणाच्या कामीं पुरुषास होणाऱ्या अनेक संकटांपासून उत्पन्न झालेल्या श्रमाचा आपल्या मधुर भाषणांनीं परिहार करावा, हा स्त्रीचा मुख्य धर्म होय. अशा रीतीनें वागणाऱ्या सुंदर जोडप्यासारखा जगतांत दुसरा सुखी कोणीही नाहीं असें समजलें पाहिजे; अशा कुटुंबांत जो

सदोदित आनंद वाटतो त्यास मोलच नाहीं. किती जरी संसारांत संकटें आलीं व किती जरी दारिद्र्यानें कष्टविलें, तरी, तीं संकटें अथवा तें दारिद्र्य अगदीं फुलासारखें भासेल यांत संशय नाहीं.

स्त्रीपुरुषांत जर मनोधर्मांचा तंटा असला तर पुरुषास कितीही इतर सुखें असोत, कितीही संपत्ति असो, त्याचे हाल कुत्राही खाणार नाहीं.. स्त्रीपुरुषांनीं परस्परनैसर्गिग गुण एक कली न होऊं देण्यास झटावें ह्मणजे दोघांचे गुण एकत्र होऊन त्यांजपासून एक विलक्षण हितावह व सुखकारक असें मिश्रण उत्पन्न होईल.

स्त्रियांनीं आपल्या साहजिक उल्हासवृत्तीनें पुरुषांचीं मनें ताजीं तवानीं राखिलीं पाहिजेत. स्त्रियांची उल्हास वृत्ति हाच एक धार पाजविण्याचा धोंडा; त्याजवर पुरुषाचें मन, धर्म, विचार हींच कोणी संकटरूपीं दुष्ट पदार्थांचें छेदन करणारीं हत्यारें पाजवून झगझगीत केलीं पाहिजेत हें अवश्य आहे.

समळी स्त्रीजात पुरुष जातीपेक्षां लुस्कान आहे, असें ह्मणणें अप्रशस्त असून खोटें आहे. ताराबाई, आनंदीबाई, अहिल्याबाई, बायजाबाई, लक्ष्मीबाई, या सगळ्या बाया कशा शूर होत्या बरें ? स्त्रियांना पुरुषांप्रमाणें अगदीं मोकळेपणानें विद्येचेंसंपादन करूं दिलें तरी स्त्रीवर्ग या नात्यानें त्या पुरुषवर्गाच्या मागें र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

हातील यांत संशय नाहीं. स्त्रिया कितीही शहाण्या झाल्या तरी महामूर्ख होत, असा लोकांचा जो ग्रह आहे व ज्या ग्रहाला अनुसरून आमच्या लोकांत स्त्रियांचें सगळें स्वातंत्र्य नष्ट होऊन त्यांना पशुतुल्य मानण्याचा प्रघात पडला आहे, तो फारच वेडेपणाचा आहे. स्त्रियांना विद्या शिकविली व त्या शहाण्या झाल्या तरी त्याजबद्दल आह्मांस कांहीं एक काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. स्त्रिया ह्या स्वभावतः पुरुषांपेक्षां बुद्धीनें वरचढ आहेत. मनोवेधक जें बाह्य सौंदर्य त्यांत तर त्यांनीं पुरुषांस मोहनी घालण्याचा मक्ताच घेतला आहे. याजबद्दल पुरुषांस ब्र सुद्धां काढण्यास जागा नाहीं. त्या प्रमाणेंच सहनशीलता, विनय, नीतिमार्गावलंबन वगैरे गुणांत पुरुषांपेक्षां स्त्रिया श्रेष्ठ आहेत. स्वरूपाच्या संबंधानें पुरुषापेक्षां स्त्रींत विशेष खुमारी आहे. चवदापंधरा वर्षांच्या मुली आणि मुलगे यांच्या मोहकपणांत फारसा भेद असत नाहीं. पंचविशीच्या सुमारास स्त्रीचें पारडें अगदीं खालीं बसतें. या वयांत पुरुष ऐन ज्वानींत असल्यामुळें बळकट, रगदार आणि सतेज दिसतो; बायकांची तशी स्थिति नाहीं. दोन तीन मुलें होऊन जाऊन सर्वांगास शिथिलता येते व त्या रोगिष्ट दिसतात. अशा स्थितींत व या उपरांत जो त्यांचेठायीं मोहकपणा दिसतो त्यासाठीं चांगलीं चांगलीं लुगडीं, व तऱ्हत-

ऱ्हेचे डागिणें ह्यांचें त्यांस आर्जव करावें लागतें. गाल बसून गेले तर एखादी हजार पांचशें रुपयांची नथ घातल्या शिवाय तोंडास खुमारी येत नाहीं; तसेंच गळ्यांत ठुशी, व सरी, वगैरेचें साह्य घ्यावें लागतें. या अनेक तऱ्हेच्या डागिण्यांचें त्यांस साह्य असल्यामुळें पुरुषांस भुलविण्याचें हें एक कसबच त्यांचे अंगीं बसून गेलें आहे असें ह्मणण्यास कांहीं एक प्रत्यवाय नाहीं. विनय, सहनशीलता वगैरे गुण स्त्रियांच्या ठायीं पुरुषांपेक्षां विशेष दिसतात.

---

## स्त्रीपुरुषांचें वर्गीकरण.

(पद) राग झिंजोटी–ताल त्रिवट.

(रुचति कां तीर्थयात्रा.) या चालीवर. (सं. सौ.)

पूर्वील त्या शास्त्रमार्गी इतिहासां शोधुनी ।
जड पाहवी कोणती ती नारींच्या शिक्षणीं ।
झाल्या त्या सुशिक्षीता किती सांगूं कामिनी ।
विद्वत्ता बघुनि ज्यांची मति जाते गुंगुनी ॥

जगामध्यें जरी अगणित जातींचे प्राणी आहेत, व त्यांची शरीररचना आणि मनोधर्म यांत जरी अतिशय अंतर आहे, तथापि त्या सर्वांमध्यें स्त्रीपुरुषसंबंध सर्वत्र साधारण आहे. आतां संपूर्ण प्राण्यांमध्यें ईश्वरानें मनुष्याचे अंगीं जें विलक्षण ज्ञान

संशोधित २०२



ठेविलें आहे, त्याचे योगानें पश्वादिकांतील स्त्रीपुरुषांच्या संबंधांत आणि मनुष्यजातींतील स्त्रीपुरुषसंबंधांत फार अंतर आहे. मनुष्यजातींतील स्त्रीपुरुषांची स्थिति तीन प्रकारची असते.

कांहीं स्त्रिया व पुरुष विषयवासनेचा उपशम करून वैराग्यमार्गाकडे वळतात व आजन्म ब्रह्मचर्य व्रतानें राहून मोक्षपदाला पावतात. अशा तऱ्हेचे ब्रह्मवेत्ते पुरुष व ब्रह्मवादिनी स्त्रिया पूर्वयुगांत असत. दुसऱ्या प्रकारांत गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुष येतात. हे विषयोपभोगाची इच्छा उत्पन्न झाल्यामुळें यथाशक्ति विवाहादिक करून नंतर शास्त्रमर्यादेनें विषयांचें सेवन करितात व संतती उत्पन्न करून आणि तिचें पोषण, व गृहस्थाश्रमास उचित अशीं पंचमहायज्ञादिक नित्यनैमित्तिक धर्मकार्यें, व परोपकारादिक सत्कृत्यें आचरून शेवटीं मोक्षपदास योग्य होतात. तिसऱ्या प्रकारांत, ज्यांच्या विषयवासना अनावर झाल्या आहेत अशीं स्त्रीपुरुषें येतात. हीं पश्वादिकांप्रमाणें यथेच्छ विषयसेवन करणें हें कर्तव्य समजून भक्ष्याभक्ष्य व गमनागमनादिकविधिनिषेध मनांत न आणितां यथेच्छ दुराचार करितात. अशा प्रकारच्या विश्वयोषिता व व्यभिचारी पुरुष फक्त आकारानें मनुष्यकोटींत गणले जाऊन आचरणानें निवळ पशु होत. अशा नृपशूंची संख्या जगामध्यें जेवढी कमी असेल तितकी चांगली.

या तीन प्रकारच्या स्त्रीपुरुषांतून आपल्यास दुसऱ्या वर्गांतील स्त्रीपुरुषांविषयीं विचार कर्तव्य आहे, पहिल्या प्रकारांत सांगितलेल्या ब्रह्मवादिनी स्त्रिया व ब्रह्मवेत्ते पुरुष महासमर्थ होत; तथापि तो मार्ग दुर्गम असल्यामुळें फारच थोड्या स्त्रीपुरुषांस साध्य होतो. परंतु दुसऱ्या वर्गांतील ह्मणजे गृहस्थाश्रमांतील स्त्रीपुरुषांची योग्यताही कांहीं कमी नाहीं. गृहस्थाश्रमांत राहणारे अनेक पुण्यशील पुरुष व पतिव्रता स्त्रिया सदाचरणानें जगतास वंद्य झाल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत. गृहस्थाश्रम सुखकर होण्याला अवश्य लागणाऱ्या साधनांत कुटुंबांतील मनुष्यांचें परस्पर प्रेम हें मुख्य साधन होय. स्त्रिया व पुरुष हीं या संसारांतील सुखदुःखादिकांविषयीं समविभागी असल्यामुळें स्त्रियांनीं पुरुषांच्या व पुरुषांनीं स्त्रियांच्या योग्यतेमध्यें न्यूनाधिक्य मानणें हें सर्वथा अप्रशस्त आहे. ज्या स्त्रियांच्या योगानें धर्म व अर्थ प्राप्त होतात, व ज्यांच्या सुप्रसन्नतेनें संतती आणि विषयादिक सुखें मिळतात, त्या स्त्रियांना केवळ भोगांगना समजून त्यांचा संग्रह करणें हें सर्वथा अयोग्य होय. ज्याप्रमाणें पुरुषांनीं संसार करीत असतांही त्यांत अलिप्त राहून परमार्थाकडे दृष्टि ठेवावी हें योग्य आहे, त्याच प्रमाणें स्त्रियांनाही परमार्थप्राप्ति अवश्य असल्यामुळें त्यांसही पुरुषांप्रमाणेंच ज्ञानसामुग्री असणें अगत्याचें

आहे. याकरितां सुशिक्षणाचे योगानें स्त्रियांचीं मनें शुद्ध असलीं पाहिजेत. सद्गुणी व सुशील भार्या हीच पुरुषाचा संसार होय. त्याचप्रमाणें स्त्रियेलाही सुशील, सुज्ञ आणि प्रीतिपात्र पती असेल तरच तिला संसारसुखानुभव घडेल. नाहीं पेक्षां गाडाभर संपत्ति व खंडभर पोरें घरांत असलीं, आणि मुख्य स्त्रीपुरुषांत जर प्रीतिरूप रज्जूचें बंधन नसलें, तर तो संसार उभयतांसही केवळ कष्टदायक होत असतो; आणि ज्या गृहस्थाश्रमाचे योगानें मोक्षपदाची प्राप्ति सुलभ होते, अशा प्रकारचा जो हा कामपुरुषार्थ तो मनुष्याच्या अधोगतीस कारण होतो. स्त्रिया व पुरुष यांचे परस्परांविषयीं निष्कपट प्रेम, सौजन्य, समानशीलता, व कर्तव्यज्ञान हींच गृहस्थाश्रमापासून परस्परांस होणाऱ्या सुखाची मुख्य साधनें असल्यामुळें पुरुषांनीं स्त्रियांची योग्यता व ज्ञान यांचा उत्कर्ष करण्यासाठीं झटणें हें त्यांचें कर्तव्य होय.

**प्रकरण २ रें समाप्त.**

# प्रकरण ३ रें.

## स्त्रियांस उपयुक्त बोध.

(पद) राग ब्याहाग—ताल—दीपचंदी

( काय वेड्या हरिणाचि ) या चालीवर ( सं. शा.)

काय हिंदु अबलांची स्थिति कैशी । विद्या मति विण ती।अहा हो॥ध्रु०॥पाश्चिमात्यांतिल त्या बघतां,ज्ञानी बहु दिसती। अहा हो ॥१ ॥ अज्ञानाचे तामिं आपुल्या स्त्रिया दिन क्रमिती । अहा हो॥२॥गृहकामें तीं सारा दिन त्या झटुनिया करिती । अहा हो ॥ ३ ॥ गृह केवळ तें जग होउनि त्या बाहिर ना सरती। अहा हो ॥ ४ ॥ हिंदु आमुचे आपल्या स्त्रींना भृत्यांपरि गणती ।अहा हो॥५॥ अल्प मंतुल्या हस्तें घडतां त्यातें गांजीती ।अहा हो॥६॥ अर्धांगी त्या तुमच्या असतां कां ऐशी रीती!अहा हो ॥ ॥ ७ ॥ विद्या योगें दुःख कळूनी वारितील फजिती । अहा हो ॥ ८ ॥ विनायक मी प्रार्थीजनहो पढवा त्या युवती ॥ चला हो ॥ ९ ॥

(१) प्रातःकाळीं व सायंकाळीं नेमानें ईश्वर संनिध आहे असें समजून त्याची प्रार्थना करावी, म्हणजे तेणेंकरून त्याची प्रसन्नता व साह्य मिळतें. मनुष्यमात्रास ईश्वराची प्रसन्नता व साह्य संपादन करणें हें अति अवश्य आहे; कारण कीं, त्याचे प्रसन्नतेवांचून आपलें

ठाणे.

जन्माचें सार्थक होत नाहीं, व त्याचे साह्या वांचून आपलें कोणतेंही काम सिद्धीस जात नाहीं. जरी उद्योग करण्याचीं साधनें ईश्वरानें दिलीं आहेत, व त्यांची योजना आपण करावी, हें ठीक आहे, तरी देवाची मदत असली तरच आपले उद्योग सिद्धीस जातात. आतां ईश्वराची प्रसन्नता कशानें मिळेल याचा विचार केला तर पापापासून दूर राहणें, त्यानें जे नियम केले आहेत त्याच त्याच्या आज्ञा समजून त्यांचें पालन करणें, सदाचारसंपन्न असणें, ह्मणजे क्रोध, लोभ, भांडण, मत्सर, शिव्या, अमंगळपणा, ढोंग, डौल इत्यादि दुर्गुणांचा त्याग करणें, सत्यमार्गानें, सत्यव्रतानें, सत्यवचनानें चालणें; याचें नांव सदाचार आहे; याच साधनांच्या योगानें ती प्राप्त होईल. अशा वर्तणुकीवर आपली बुद्धि निश्चयानें ठरण्याकरितां ईश्वराचें भय पाहिजे. दुराचार केला तर ईश्वर शिक्षा करितो, सदाचार केला तर ईश्वर प्रसन्न होतो, हें लक्षांत ठेवून त्याचें भय मनांत राहण्याकरितां त्याचें स्मरण करून उपासना, प्रार्थना, भक्ति करणें अवश्य आहे. या अभ्यासानें त्याचें सान्निध्य होऊन वाईट कांहींच होत नाहीं. आणि तो प्रसन्न झाला ह्मणजे आपले सत्कार्यासही मदत करील, आणि आपले सत्य मनोरथ सिद्धीस नेईल. यास्तव त्याचें स्मरण व प्रार्थना नित्य नेमानें करीत जावी.

(२) वडिलांची मर्यादा राखणें; ह्मणजे प्रथम आई बाप आणि राजा यांहून या जगांत थोर दुसरे नाहींत, याकरितां त्यांणीं सांगितलेलें ऐकावें. त्यांचा अनादार करूं नये. आपल्याहून श्रेष्ठ असतील त्यांशीं लीनतेनें वागावें. लीनता ह्मणजे आपल्यास लहान समजणें. आपण गर्व वाहण्याजोगें आपल्याजवळ कांहीं नाहीं हें खचित आहे तत्रापि जर कांहीं असलें तरी तें ईश्वराचे कृपेनें मिळालें आहे. त्या विषयीं आपण गर्व वाहणें हें पाप आहे. कोणतेही प्रसंगीं गर्व वाहणें हें अनुचित व लोकांस त्रासदायक आहे. याजकरितां आपण सर्वांहून लहान आहों, असें समजून चालावें. याचें नांव लीनता. ही अंगीं असली ह्मणजे सर्व आपल्यावर दया करितात, व अनेक पापें टळतात. सासू, सासरा, नवरा, थोर दीर हीं सर्व वडील माणसें. यांचा मान राखावा. त्यांस राग येईल असें कांहीं करूं नये. यापासून बहुत फायदे आहेत.

(३) आपले घरची अन्नवस्त्राची व शरीराची स्वच्छता चांगली ठेवावी. ओंगळपणा ह्मणजे अमंगळपणा हा अनेक रोगांचें कारण आहे. याजकरितां स्नान करणें, वस्त्रें निर्मळ ठेवणें, पाणी गाळून पिणें, केर काढणें, हातपाय धुणें वगैरे विषयीं आळस करूं नये. हें आपल्या हिताचें काम आहे.

( ४ ) संसारांत केवळ डौला करितां निरुपयोगी व्यय न करणें याचें नांव दक्षता. भोळसरपणानें किंवा अभिमानानें बायका फाजील खर्च करतात, दुसऱ्यास देतात; ही चाल वाईट आहे. याजकरितां आपले वडिलांचे संमतीनें थोड्या खर्चांत लौकिक व उपयोग फार होईल, असा खर्च करावा. बहुत खर्चाकडे अगदीं लक्ष देऊं नये. द्रव्य श्रमावांचून प्राप्त होत नाहीं, याजकरितां परोपकार किंवा स्वसंरक्षण यांजकडे मात्र तें लावावें. अन्यथा खर्च करणें हें पापच आहे. वस्त्रें व डागिणे यांजवर विशेष भर नसावा. कारण मनुष्यास सद्बुद्धि, विद्या, सद्गुण, हेच अलंकार आहेत. आणि ते जसे पुरुषांस शोभवितात तसे स्त्रियांसही शोभवितात. त्यांची बरोबरी कोणत्याही रत्नांनीं, धातूंनीं अगर सुंदर वस्त्रांनीं होणार नाहीं.

(५) व्यासंग ह्मणजे विद्येवर लक्ष देणें व जितका वेळ सांपडेल तितका बुद्धि वाढविण्याकडे लावणें. सर्वांस रिकामा वेळ सारखा नसतो; कोणास अनेक प्रपंचाचीं कामें असतात, त्यांत तो बराच जातो; परंतु कोणास अगदीं अवकाश सांपडणार नाहीं असें नाहीं. कितीएक गुरें राखतां राखतां विद्या शिकले, चाकरी करितां करितां विद्वान् झाले. याचें कारण काय कीं, त्यांणीं आपला वेळ फुकट जाऊं दिला नाहीं. एवढी गोष्ट लक्षांत

ठेवली तर मनुष्य फार शहाणें होईल. जरुरीचीं कामें करून बाकी वेळ जो राहील तो वाचण्याकडे, अर्थ करण्याकडें, गणितपुतकांकडे द्यावा. गेला वेळ पुनः येत नाहीं, अशी ही अमूल्य वस्तु आहे. वेळाचा उपयोग न केल्यामुळें लोक उनाड, अज्ञानी, द्वांडगे, दुष्कर्मी होतात. ह्मणून जसें द्रव्य तसाच काळ. तो कसा जातो, काल मी काय शिकलें, आज आणखी काय शिकावयाचें, याची काळजी ठेऊन पुस्तकें वाचण्याचा बहुत अभ्यास करून त्याचा विचार करावा. असें करितां करितां बुद्धि विशाळ होऊन ज्ञान प्राप्त होतें.

(६) आळस हा मोठा शत्रु आहे. याला जिंकला पाहिजे. विश्रांति वेगळी व आळस वेगळा. विश्रांति पाहिजे, परंतु आळस नसावा. ह्मणजे विश्रांतीचें कारण नसतां काम न करणें, रिकाम्या गप्पा मारणें, पडून राहणें, या सर्वांचें नांव आळस. मनुष्यानें ध्यानांत ठेवावें कीं, आपला काळ फुकट जाऊं नये. मी काल किती शहाणी होतें, आज किती अधिक शहाणी झाल्यें, हें तपासावें. जसे सावकार व्याजाचा हिशेब पहातात, तसाच ज्ञानाचाही सर्वांनीं पहावा. त्यांत शिकणारे मुलीस तर तो पाहणें अति अवश्य आहे. मनुष्याचें मन रिकाम्या पिशवीप्रमाणें आहे. जें जें भरावें तें त्यांत राहील आणि किती राहील याचा

नेम नाहीं, एवढी मोठी ती पिशवी आहे. यास्तव त्यांत चांगल्या कल्पना भरून तें सुशोभित करावें.

(७) दया ह्मणजे दुसऱ्याचें चांगलें करण्याकरितां झटणें. जों जों ज्ञान वाढतें, तों तों दया वाढते. जों जों ईश्वराचें भय व ईश्वराविषयीं ज्ञान वाढतें, तों तों दया वृद्धिंगत होते. याचें कारण ईश्वर परम दयाळू आहे. हा त्याचा गुण आपल्यास समजला ह्मणजे तसें चालण्याची त्याची आज्ञा समजून ती आपण त्याचे भयानें मोडीत नाहीं. तो सर्वत्र प्रकाशमान आहे असें समजलें ह्मणजे आपल्या सारखी परक्याचे ठायीं बुद्धि होऊन दृष्टीमध्यें समता येते. तसेंच दुसऱ्याची हकीकत समजून घेतली ह्मणजे त्याजवर दया करावी किंवा नाहीं हें समजतें. याजकरितां सर्व प्राणिमात्रांवर दयाभाव असावा, व त्यांस विद्यादिकें करून उंच प्राणी करावें. शाळा घालणें, गायन करणें, वाचणें, विचार करणें, या सर्वांचा हेतु एकच आहे; तो हा. ज्या प्राण्यास शक्ति आहे त्यास सद्बुद्धि देऊन पहिल्यापेक्षां चांगला करावा. उदारबुद्धि व्हावी या करितां मुलांस लिहिण्याचें सामान देण्यांत, पुस्तकें घेण्यांत कमती करूं नये. यथाशक्ति दुसऱ्यांचे मुलांसही उत्तेजन देण्यास कमी करूं नये. दरिद्री, पीडित, रोगी, अज्ञानी यांस चांगले तृप्त, निरोगी, ज्ञानी करण्याचा कळवळा राखावा. हा

सामान्य धर्म आहे. दुष्कर्मी, व धूर्त इत्यादिकांवर मात्र दया करणें ठीक नाहीं. तथापि त्यांस सुधारण्या विषयीं दयापूर्वक त्यांशींही वर्तावें हें योग्य आहे.

(८) अवधारण, ह्मणजे जें वाचलें तें समजून ध्यानांत ठेवणें, त्याविषयीं विचार करणें आणि त्याप्रमाणें चालणें. सर्व शिकण्याचें फळ इतकेंच आहे कीं, सद्बुद्धि, सत्कर्म, सद्गुण हीं संपादन व्हावीं. मन व बुद्धि मोठीं होऊन पदार्थांचें यथायोग्य ज्ञान व्हावें. बालत्वापासून अनेक प्रकारच्या भ्रांति असतात त्यांचा निरास व्हावा. सत्याची अभिरुचि लागावी. असत्याचा तिरस्कार वाटावा. लीनता, नम्रता, प्रगट व्हावी. द्वेष, मत्सर, क्रोध इत्यादि दुर्गुणांचा ऱ्हास व्हावा. वाईट वासना नष्ट व्हाव्या. सदुद्योगीं लक्ष जडावें. हे सर्व उद्देश ध्यानांत ठेऊन ते साधतां येतील अशी सर्व शिकणाऱ्यांनीं तजवीज करावी. एक किंवा दोन ग्रंथ वाचण्यानें विद्या होत नाहीं. अनेक ग्रंथांचें अवधारण झालें पाहिजे. याजकरितां जसें संसारसंबंधीं वस्त्रपात्र आपण संग्रह करितों त्याच प्रमाणें प्रत्येक घरीं ग्रंथांचा संग्रह करून त्यांचा उपयोग करावा. स्वभाव एक प्रकारचा असतो, पण तो अभ्यासानें दुसऱ्या प्रकारचा होतो. ह्मणून शाळा घालणें हें जरूर आहे. त्यांचा लाभ मुलांस व मुलींस झाला नाहीं, तर तीं बुद्धिमान व

विद्वान होणार नाहींत. यास्तव हा लाभ ज्या मुलींस आहे त्यांणीं आपल्यास मोठें भाग्यवान समजावें.

---

## कुटुंबांतील विचार.

कुटुंबांतील सर्व मनुष्यें जर प्रीतीनें आणि एक मतानें वागत असलीं, तरच त्या कुटुंबांतील प्रत्येक मनुष्य सुखी असतें. परंतु त्यांतील मनुष्यें जर एकमेकांचा द्वेष करून कलह करूं लागलीं, तर त्या कुटुंबांत दुःखाचा प्रवेश होऊन थोड्याच काळांत त्या कुटुंबाची वाताहत होते. कुटुंबकलह हा अवदशेचा पाया आणि दुःखाचा डोंगर आहे. या अवदशेच्या फेऱ्यांत न सांपडलेलें दैववान व सुखी कुटुंब क्वचित सांपडेल. या कुटुंबकलहांत पुरुषांपेक्षां स्त्रिया अग्रणी असतात. जन्मापासून प्रीतीनें आणि ममतेनें वागणऱ्या भावाभावांत वैमनस्य आणि तंटे उत्पन्न होण्याला स्त्रियां वांचून दुसरें कोणतें वरें कारण आहे? कुटुंबामध्यें अनेक स्वभावाच्या मनुष्यांचा संबंध असतो. कुटुंबकलहाची ठिणगी उत्पन्न झाली ह्मणजे मग तो कलहाग्नि पेटत पेटत सर्व कुटुंबाचा विध्वंस केल्यावांचून थांबत नाहीं. हा भयंकर अग्नि आपले कुटुंबांत उत्पन्न होऊं न देण्याविषयीं स्त्रीपुरुषांनीं फार जपलें पाहिजे.

आतां हा कुटुंबकलह, वेळेवर अन्न मिळण्याला महाग झालेल्या गरिबाचेच घरांत असतो आणि श्रीमंताच्या घरांत नसतो असा कांहीं नेम नाहीं. हा राजापासून तों रंकापर्यंत सर्वत्र दृष्टीस पडतो. जें घराणें कुलीन व सुशिक्षित असतें तेथें याची फारशी बाधा नसते. आणि या कुटुंबकलहाची जोंपर्यंत सुरवात झाली नाहीं, तोंपर्यंतच कोणत्याहीं घराण्याचा कुलीनपणा कायम असतो. आजपर्यंत कालगतीनें लक्षावधि थोर कुटुंबांचा फडशा उडाला व उडत आहे. या विषयीं विचार करून पाहिलें असतां हें सर्व अपयश या कुटुंबकलहाच्या माथ्यावर येऊन पडतें. पेशव्यांचें जगप्रसिद्ध घराणें या कलहाग्नीनेंच पेटवून टाकलें. कुटुंबांतला कर्ता पुरुष पराक्रमाचे योगानें प्रसंगीं हजारों शत्रुंशीं टक्कर मारून आपल्या कुटुंबाचें संरक्षण करील, विद्वत्तेचे जोरावर हजार युक्ति प्रयुक्ति लढवून आपल्या कुटुंबाचें पोषण करील, आणि कुटुंबांतील मनुष्यांच्या सर्व इच्छा तो शक्त्यनुसार पुर्ण करण्याची हिम्मत बाळगील; पण त्याच्याच कुटुंबांत जर कलहरूपी वैऱ्याचा पायशिरला तर मग त्याची अकल अगदीं गुंग होऊन जाते. त्याचें सर्व शौर्य आणि विद्वता कुचकामाचीं होतात. आणि त्याचा कर्तेपणा दमडीच्या मोलाचा होऊन जातो.

तेव्हां तात्पर्य काय कीं, कुटुंबामध्यें एकदां या कलहाची सुरवात झाली ह्मणजे कांहीं तरी अनर्थ घडल्यावांचून राहत नाहीं. ज्या कुटुंबांतील मनुष्यें परस्परांवर प्रीती करून संतोषानें आणि एक मतानें राहत असतील तें कुटुंब जरी दारिद्र्याचे फेऱ्यांत असलें, तथापि सुखाचेंस्थान आणि लक्ष्मीचें घर होय. ज्या कुटुंबांत कलह, दुरवास, व परस्परांविषयीं अप्रीति असेल तेथें गजांतलक्ष्मीचा वास असला, तथापि तें दुःखाचें स्थान आहे असें आपण खात्रीनें समजावें.

**प्रकरण ३ रें समाप्त.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# प्रकरण ४ थें.

## स्त्रियांचे पराक्रम

(पद) राग—शंकराभरण—ताल—धुमाळी.

नाहिं सुभद्रा या चालीवर (सं. सौ.)

कांहो अबला शिक्षणिं तुह्मी दूषण तें देतां। अमृत पीतां नाशन जाणुनि मूर्ख कसे होतां। विद्यारूपी सुधा तयांते लवलाहीं देतां। अहोरात्र त्या सौख्यामाजीं नाहीं कमतरता। स्पष्ट असें हें दिसुनी तुह्मां भल तें कां वदतां। वेडअसें हें पढत मूर्ख हो कैसें पाघारितां॥ कांहो ॥ १ ॥

या जगामध्यें भिन्नभिन्न जातींचें सहस्रावधि प्राणी आहेत; तथापि प्रत्येक जातीच्या प्राण्यांचे शरीरावयव व मनोधर्म एक सारखे मिळावयाचे. आतां देशभिन्नत्वामुळें व निरनिराळया हवेच्या आणि पाण्याच्या योगानें जरी त्यांत यत्किंचित् अंतर दृष्टीस पडलें, तथापि त्यांचे मनोधर्म व जाति एक आहे असें अवलोकन करणारांचे तात्काळ लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. जंगली एकादा मनुष्य, व सुधारणेच्या शिखरास पोंचलेले देशांतील राज्यपदावर आरूढ झालेला प्रत्यक्ष बादशहा, यांच्या शरीररचनेंत व मनोधर्मांत कांहीं अंतर असतें काय ! एकापेक्षां दुसऱ्याचें स्वरूप तेजःपुंज, बुद्धि

विशाळ, विचार प्रौढ व पराक्रम प्रज्वलित असून तो सहस्रावधि लोकांवर आपली सत्ता मिरवितो आणि अगणित ऐश्वर्याचा व राज्यसुखाचा अनुभव घेतो; आणि बिचारा तो जंगली मनुष्य पोटभर अन्न व जाडेंभरडें वस्त्रदेखील मिळत नसल्यामुळें रानोमाळ भटकत फिरतो. त्याच्यामध्यें मानवी जातीच्या मनोधर्मांचें वास्तव्य किंवा तेज नाहीं कीं काय? अलबत आहे. मग तें दृष्टोत्पत्तीस कां येत नाहीं? याचें कारण, त्याच्या पारतंत्र्याच्या अवजड बोजानें त्याच्या अंगांतील शौर्यादि अनेक मानवी प्राण्याचे ठायीं असणारे गुण चेंगरून जाऊन दिसेनासे होतात. तेव्हां तात्पर्य काय कीं एका जातीचे प्राण्यांत सर्वत्र सारखे गुण ईश्वरानें निर्माण केले आहेत. परंतु मनुष्यें आपल्या बुद्धिकौशल्यानें एकमेकांवर वरचढपणा करून आपला थोरपणा व वजन राखण्याकरितां त्या ईश्वरनिर्मित गुणांचा दुसऱ्यास यथेच्छ उपभोग घेऊं देत नाहींत.

वर जें राजाचें व रंकाचें उदाहरण दिलें तें जगाच्या पूर्वापार राहटीस अनुसरून असल्यामुळें, व सर्व जग निरिच्छा व शांतता हें जें वेदांताचें तत्व त्यास मिळून निर्दोष झाल्यावांचून लुप्त होणारें नसल्यामुळें, त्याविषयीं जगास दूषण देणें किंवा तो प्रकार नाहींसा होण्यासाठीं उद्योग करणें हें दर्यावरील रेतीपासून तेल निष्पन्न करण्याचा यत्न करण्यासारखें

आहे. मानवी प्राण्याचे ठायीं ईश्वरनिर्मित जे काम क्रोधादि गुण, यांचें जोंपर्यंत या जगांत वास्तव्य आहे, तोंपर्यंत राजारंकाचा व उच्चनीचत्वाचा प्रकार दृष्टीस पडावयाचाच. कारण या सर्वांस कारणीभूत जें वैर व हेवा तो मनुष्याच्या मनोधर्मांपैकीं प्रधान होय; तेव्हां याविषयीं मनुष्यांस विशेष दूषण देतां येत नाहीं. परंतु ज्या ठिकाणीं या वैराचा लेश देखील नसतो, अशा कामांत मनुष्यांनीं निष्कारण दुसऱ्याचा उपमर्द करावा, त्याचे मनोधर्म भ्रष्ट करावे व त्याजवर वेडगळ सत्ता मिरविण्याचा यत्न करावा हें अश्लाघ्य होय.

जगांतील सर्व जातींत साधारण असा जो स्त्रीपुरुष भेद त्याच्याहून मानवी प्राण्यांतील स्त्रीपुरुषांत कांहीं विशेष अंतर दृष्टीस पडत नाहीं. ईश्वरानें पुरुषांचे अंगीं ज्या मनोधर्मांचें व गुणांचें सामर्थ्य ठेविलें, तेंच सामर्थ्य स्त्रियांचेही अंगीं ठेविलें आहे. असें असून त्यांस आपण बलहीन, शौर्यहीन व मूर्ख मानतों, हें आश्चर्य नव्हे काय? आमचें हें ह्मणणें मोठें चमत्कारिक वाटेल. कारण स्त्रिया ह्या खरोखर वरील प्रकारच्या ह्मणजे पुरुषांपेक्षां पराक्रमानें व गुणांनीं अतिशय कमी असल्याचें आज आपले प्रत्यक्ष दृष्टीस पडतें असें असून प्रत्यक्ष प्रमाणास विरुद्ध असें आह्मीं कसें प्रतिपादन करतों याचें आश्चर्य वाटेल. पण हा विचार आमच्याही

मनांत आला आहे. स्त्रियांचे अंगीं वरील प्रकारचे लघुतादर्शक गुण दृष्टीस पडतात हें आह्मीही कबूल करितों. परंतु याजवरून त्या तशाच आहेत किंवा असावयाच्या, किंवा ईश्वरानें त्यांस तशाच निर्माण केल्या आहेत, असा सिद्धांत करतां कामा नये. स्त्रियांस जे वरील दुर्गुण जडले आहेत त्यांचें कारण पुरुषच होत. मनुष्य ज्या स्थितींत नेहमीं असतो तशा प्रकारची त्याची मनोवृत्ति असावयाची असा साधरण नियम आहे. आपल्या घरांतील गडी यास नेहमीं भांडीं घांसण्याचा व केर काढण्याचा अभ्यास असल्यामुळें त्यास कारकुनाचें काम करितां येत नाहीं खरें, परंतु तो जन्मास आला त्यावेळीं गडी किंवा अविद्वान ह्मणून जन्मास आला नाहीं. ही गोष्ट अभ्यासाची आहे. आतां याजवर अशी शंका येईल कीं सर्वच लोक विद्वान, शूर व पराक्रमी झाले व यजमान होण्याची इच्छा करूं लागले, तर जगाचा व्यवहार चालेल कसा? याजवर आमचें असें उत्तर आहे कीं सर्व लोकांचा आणि स्त्रीपुरुषांचा संबंध वेगळा असून खेरीज आमच्या लेखाच्या हेतूचा वरील विद्याशब्दाशीं संबंध नाहीं. आमचें ह्मणणें इतकेंच कीं, स्त्रीपुरुषांत जन्मतःच जे गुण असावयाचे ते स्त्रियांचे अंगीं नाहींत असें पुरुषांनीं मानणें, किंवा त्यांच्या अंगीं तसे गुण आहेत असें

समजलें असूनही वेडगळपणानें व हेव्यानें त्यांजवर वरचस्वपणाचें पांघरुण घालून ते जनाच्या दृष्टीस न पडत अशा तऱ्हेची तजवीज करणें हें सुज्ञ मनुष्यांस उचित नाहीं. आतां हें खरें कीं, जगाच्या साधारण व्यवहाराप्रमाणें पाहूं लागलें असतां आपल्या पेक्षां दुसऱ्याची योग्यता कमी नसावी, असें मानणारा मनुष्य फारच विरळा मिळेल. ज्यास त्यास मी दुसऱ्याहून वरचढ असावें असें वाटतें. तेव्हां स्त्रियांवर आपला अंमल असावा व त्यांणीं आपल्या ताब्यांत रहावें असें जर पुरुषांचे मनांत आहे, तर शौर्यादि त्यांचे अंगीं असणारे गुण जितके दावले जातील तितके दावणें हें त्यांचें कर्तव्यच होय. तसेंच त्यांच्या अंगीं जडलेला अज्ञानपणाही वरील हेतूस इष्टच आहे असें कोणासही वाटेल. परंतु थोडा विचार केला तर लक्षांत येईल कीं, वरील प्रकार आपल्या शत्रूचे संबंधास लागू होय. ज्या वर्गाचें प्राबल्य आपल्या पेक्षां जास्त झालें असतां त्यापासून आपणांस अपाय होण्याची भीति असते, तशा वर्गांत स्त्रियांची गणना करतां येत नसल्यामुळें वरील प्रकार दुग्धापासून अंमल येईल असें मानण्यासारखा आहे. स्त्रिया विद्वान व शौर्यादिगुणसंपन्न झाल्या तर त्यापासून त्यांच्या पतींस व परंपरया एकंदर जगास केवढा बरें फायदा होईल. मनुष्याचे विचार

स्वतंत्र व सत्यासत्याचा विचार करण्यास योग्य झाले ह्मणजे त्यास दुसऱ्याच्या दाबांत राहणें आवडत नाहीं, असा लोकव्यवहार आहे. तेव्हां स्त्रियांस वरील शौर्यादिगुणांनीं परिपूर्ण व विद्वान करून त्यांजवर आपलें असलेलें वर्चस्व दूर करावें व त्यामुळें आपण त्यांच्या ताब्यांत रहावें ही गोष्ट कोणत्या व्यवहारशास्त्रांत सांगितली आहे ! असा कित्येकांचे मनाचा ग्रह असतो, पण हा ग्रह फार चुकीचा आहे कारण स्त्रीपुरुषांत जरी उच्चनीचत्वाचा प्रकार दृष्टीस पडतो, तथापि तो शत्रुत्वाचा नसून जगाच्या राहाटीप्रमाणें तो तसा कधींही घडणार नाहीं. कारण स्त्रीपुरुषांचे गुणांचें, पराक्रमाचें व वैभवाचें सार्थक्य झटलें ह्मणजे त्या परस्परांतील प्रेम व ऐक्य होय. तशांतून स्त्रियांची स्थिति ही पुरुषांविषयीं—पुरुषांची स्त्रियांविषयीं असते तितकी—बेपर्वा नसून त्यांचें अंतःकरण हें जन्मतःच कोमल व प्रीतिपात्र असल्यामुळें त्यांच्या अंगीं वरील गुणांचें तेज आविर्भूत झालें ह्मणून त्या आपल्या पतींची पर्वा किंवा काळजी करणार नाहींत असें ह्मणण्यास सबळ कारण दाखवितां येईल असें आह्मांस वाटत नाहीं.

स्त्रिया कितीही विद्वान, शूर व पराक्रमी झाल्या तथापि त्यांस पुरुषांची मदत अवश्य होय. सांप्रतकाळीं ज्यांस आपण स्त्रीजित म्हणतों व ज्यांच्या

मध्यें स्त्रिया विद्वान व स्वतंत्र असल्याचें पहातों, आणि ज्यांचे हक्क पुरुषांचे बरोबरच नव्हत, पण त्यांच्या पेक्षांही पुष्कळ पटीनें जास्त महत्वाचे आहेत असें मानल्यानें त्यांच्या चाली वाजवी पेक्षां फाजील निर्भीड व स्वतंत्र झाल्या आहेत, अशा युरोपियन लोकांतील स्त्रियांचा पुरुषांवर जरी विशेष दाब आहे असें ते समजतात, तथापि वस्तुगत्या तो मानण्यापुरताच असून मोठ्या विद्वान व जहांबाज आणि स्वतंत्र म्हणविणारे बायकोसही पुरुषाचे आधीन राहावें लागतें, असें आपण हमेषा पाहतों. तेव्हां याजवरून आपल्यांतील स्त्रियांत जर पूर्वोक्त गुणांचा प्रसार होईल तर त्या पासून पुरुषांस पुष्कळ प्रकारची मदत मिळण्याची आशा आहे. आणि अशा तऱ्हेचे मदती पासून उभयतांसही सुखोत्पत्ति होऊन संसार सुरळीत चालेल. आजन्म ज्यांचा सहवास असावयाचा अशा मनुष्यांची योग्यता समान असली पाहिजे. त्या शिवाय त्यांच्यांत प्रेमभाव राहणार नाहीं.

स्त्रियांचे अंगीं शौर्यादिगुणांचें वास्तव्य जन्मतःच असतें. ही गोष्ट आपणांस पुराणांतरीं ऐकून माहीत आहे. आपल्या सर्वमान्य अशा पौराणिक ग्रंथांत स्त्रियांचें शौर्य व पराक्रम यांची फार प्रशंसा केलेली आढळते. महिषासुराचा नाश करणारी प्रसिद्ध महिषासुरम-

थिनी जगदंबा, जिणें संपूर्ण देवांस दुर्जय अशा दैत्याचा एका क्षणांत विध्वंस केला, तिचें अद्भुत तेज व विलक्षण पराक्रम अवलोकन करून देवही जवळ जाण्यास भीत असत. दुसरी प्रसिद्ध साध्वी जानकी. शतमुखी रावणाच्या वधाचे वेळीं रामानें आत आपणास अपयश येतें असें समजून जिची प्रार्थना केली व जिणें मोठ्या क्रोधाविर्भावानें हं हं ह्मणतां त्या शंभर तोंड्या अक्राळ विक्राळ दैत्याचा फडशा केला, तिचा पराक्रम साधारण ह्मणावयाचा काय ? तशीच सत्यभामा जी पतिसमवेत रणवाद्यांचा भयंकर नाद होणाऱ्या संग्रामांत शिरून हातांत धनुष्यबाण घेऊन दैत्यां बरोबर लढण्यास सिद्ध झाली व जिनें शेवटीं त्यांचा नाश केला, अशा शूर स्त्रियेस कमी पराक्रमी ह्मणावें काय ?

ही गोष्ट अवतारी स्त्रियांची झाली. या खेरीज भारती युद्धांतील महान योद्धा व प्रसिद्ध विरांसही अजिंक्य असा जो धनंजय त्याची प्रमिला राणीनें काय दुर्दशा केली! मोठ्या मी मी ह्मणणाऱ्या त्याच्या संपूर्ण अनुयायी वीरांस बंदिखान्यांत घातलें; व शेवटीं अर्जुनाचीही तीच अवस्था करावयाची, इतक्यांत तिच्या अतुल पराक्रमा बद्दल आकाशवाणी झाल्यामुळें अर्जुनास तिच्याशीं साम करण्याचा प्रसंग आला. ही गोष्ट बहुधा आबालवृद्धांस माहीत असेलच.

स्त्रियांचे अंगीं शौर्यादि गुण पुरुषांप्रमाणेंच जा-

गृत आहेत व ते जगन्नियंत्यानें जन्मतःच त्यांस दिले आहेत असें मानण्यास कांहीं प्रत्यवाय आहे काय ! वर जीं आह्मीं उदाहरणें दाखविलीं, त्यांजवरून प्रस्तुत विषयास प्रतिकूल असें मत असणारे लोक कदाचित अशी शंका घेतील कीं, हीं उदाहरणें ग्रंथांतरीं लिहिलीं आहेत, या गोष्टी कोणी प्रत्यक्ष पाहिल्या आहेत काय? बहुधा अशी शंका घेणारा मनुष्य मिळणें विरळाच होय. तथापि तो मिळाल्यास त्यास समर्पक व समाधानकारक उत्तर देण्यास फारसें कठीण नाहीं. कारण एक तर वरील पौराणिक ग्रंथ पुरुषांनींच लिहिले असल्यामुळें विनाकारण ते पुराणकर्ते स्वतःपेक्षां स्त्रियांची जास्त प्रशंसा करतील असें घडावयाचें नाहीं. तशांतून त्याही गत गोष्टीवर कोणास भरंवसा व विश्वास ठेवावयाचा नसल्यास नुकतेंच परवां जिणें आपलें नांव स्वदेशांत व द्वीपांतरांत गाजविलें व जिणें आपल्या पराक्रमानें ब्रिटिश फौजेची आणि मोठमोठ्या सरदार बहादुरांची धांदल व दाणादाण उडविली, त्या प्रसिद्ध लक्ष्मीबाईचें नांव आह्मीं मोठ्या आनंदानें व हर्षानें लोकांपुढें ठेवितों. या लक्ष्मीबाईची ओळख " लक्ष्मी " या नांवानें कदाचित पटणार नाहीं, कारण ही प्रतापी बाई " झांशीची राणी " या नांवानें प्रसिद्ध आहे. इच्याच पूर्वीं अहल्याबाई व बायजाबाई या नांवाचीं दोन स्त्रीरत्नें या देशांत नि-

र्माण झालीं होतीं, त्यांचीही बहुधा सर्वांस ऐकून मा-
हिती आहेच. झांशीच्या राणीचें चरित्र नाटकरूपानें
प्रसिद्ध झाल्याचें आमच्या वाचकांस माहीत आहेच.
त्यांतही तिचा वृतांत केवळ सत्यास अनुसरून असेलच
असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. कारण या आपल्या
देशाचे इतिहासाकडे लक्ष दिलें ह्मणजे तो परदेशी-
यांचे हातून लिहिला गेला असल्यामुळें जसा त्यांत ज-
यापजयाचे संबंधानें हिंदूंस दोष दिलेला आढळतो, तसा
मासला वरील नाटकांतही कोठें कोठें आढळतो. आ-
तां या देशांतील लोकांचे प्रस्तुतचे स्थितीचे मानानें
वरील प्रकार हा साहजिक व योग्यच आहे हें आह्मी
कबूल करितों. परंतु आमच्या या अशा गुलामगि-
रीनें व दुर्दैवानें मानवी जातींतील वरील प्रकारच्या
सद्रत्नांस निष्कारण कलंक लागतो. असो; तेव्हां
तात्पर्य काय कीं स्त्रियांचे अंगीं स्वदेशाभिमान, परा-
क्रम आणि खरमरीत शौर्य असल्याचें हें वरील उदा-
हरण अद्यापपर्यंत लोक दृष्टीचे आड देखील झालें नाहीं.
वरील स्त्रीरत्नाविषयीं आपणास आनंद वाटेल व आप-
ण तिची प्रशंसा करूं यांत कांहीं नवल नाहीं. परंतु
परदेशीयांनीं व तशांतून ज्यांच्याशीं तिनें टक्कर मा-
रिली व ज्यांस देशपार करण्याचा तिचा इरादा असून
त्याकरितां जिणें हातावर शीर घेऊन मरेन किंवा
मारीन अशा निग्रहानें ज्यांच्या सैन्यांतील शेंकडों

लढाऊ लोकांचा चकाचूर उडविला, त्या युरोपियन लोकांनींही तिची प्रशंसा व वर्णन केलें आहे. अशा साध्वीची योग्यता कोणत्या शब्दांनीं वर्णन करावी! असो; या राणीचे संबंधानें एका परदेशीयानें लिहून ठेविलेला प्रशंसनीय लेख आह्मी आपले वाचकांस सादर करितों:—

"देशी राज्यकर्त्यांत परचक्राशीं शौर्यानें टक्कर देण्यांत 'झांशीची राणी लक्ष्मीबाई' प्रमाणें दुसऱ्या कोणांतच तितके जबरदस्त गुण दिसून आले नाहींत. कारण तिनें आपल्या विलक्षण शौर्यानें ब्रिटिश फौजेस अगदीं दरारा घालून सोडला होता. त्या वेळीं घोडेस्वारांतील रिसाली पोषाख करून स्वतः फौजेस हुकूम देत असतां युद्धसंग्रामांतच ती मरण पावली. सर ह्यू रोज साहेबानें स्पष्टपणें ह्मटलें आहे कीं शत्रूच्या बाजूस उत्तम मनुष्य काय ती झांशीची राणीच होय. तशीच पंजाबांतील पटियाला संस्थानच्या भांडण लागलेल्या गादीवर ब्रिटिश लोकांनीं आसकुंवर नामें एका राणीची स्थापना केली, त्यावेळीं तें राज्य अगदीं अव्यवस्थित झाल्यामुळें लोक बिथरलें होते; तथापि त्यांवर अधिपत्य चालविण्यास तीच योग्य होती; कारण इतिहासकारानें एके ठिकाणीं असें लिहून ठेविलें आहे कीं, तिनें एका वर्षाच्या आंतच

त्या राज्याची उलटापालट करून विथरलेल्या खेड्या पाड्यांचा एकदम बंदोबस्त केला; सारा इत्यादि वसूल चालू केला व सर्वत्र व्यवस्था व अबादानी करून सोडली."

**प्रकरण ४ थें समाप्त.**

# प्रकरण ५ वें.

---

## बाल्यावस्था व सुशिक्षण.

(पद.) राग—गौरी, ताल, धुमाळी.

हे मना सोड कल्पना या चा. (सं. शा.).

हे नरा, सुक्रिया करा, अजब ती तऱ्हा । तुह्मांला मिळते । तिज पासुनि सुख तें जाण निरंतर होतें ॥ ते होतसे, तुह्मां सुख जसें, स्त्रियांनां तसें, निरंतर पढवा ॥ सत्कीर्तीचा तो लाभ तुह्मीं कीं घ्यावा ॥

बाळपण, तारुण्य आणि वृद्धापकाळ या तीन्ही अवस्था मुलगे आणि मुली किंवा पुरुष व स्त्रिया यांस एका नियमानेंच यावयाच्या. परंतु त्या स्थितींत मुलांचे व मुलींचे विचार, त्यांची गृहस्थिति, शरीररचना आणि आचार यांजमध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे. मुलापेक्षां मुलीचे स्थितींत फारच अंतर दृष्टीस पडतें. तिच्या बाळपणचे व तरुणपणचे विचारांत कांहींच मेळ नसतो. तरुपणीं जे तिचे विचार होतात व जो विलक्षण आपपरपणा तिचे अंतःकरणांत बिंबून जातो त्या संबंधाची कल्पनादेखील बाळपणींचे अवस्थेंत तिचे मनांत येत नाहीं. तिच्या मनाचे अशा प्रकारचे विचार होण्याचा काल

ह्मटला ह्मणजे विवाहसमय होय. अलीकडे अप्रशस्त वयामध्यें मुलींचीं लग्नें करण्याचा जो दुःखकारक प्रघात पडून गेला आहे, त्याचे योगानें मुलीचे मनोव्यापारांवर व स्थितीवर एक मोठा जुलूम होतो. ज्याप्रमाणें एखाद्या जुलमी व दांडग्या मनुष्यास त्याचे अनुयायी लोक गरीब बिचाऱ्या रयतेकडून राजा ह्मणवितात, त्याचप्रमाणें प्रस्तुतचे लग्नांत नवरे मुलीशीं नवरा व सासुसासरा यांचें नातें चिकटवून देणें होय. वस्तुतः मुलीचे अंतःकरणांत त्या नात्याची कल्पना देखील नसते. अर्थांतच आहे, ज्या वयामध्यें ती बिचारी मुलगी आपल्या बाळपणच्या मैत्रिणीं बरोबर आंधळी कोशिंबीर आणि भातुकलीचा खेळ खेळण्यांत गुंतून जावयाची व भावलाभावलीचीं लग्नें करून त्या समारंभांत दंग होऊन रहावयाची, अशा प्रसंगीं जर तिला पिंजऱ्यांत कोंडून ठेविलेले मैने प्रमाणें सासरीं अडकवून ठेविलें, तर त्या गरीब मुलीच्या चित्तास उल्हास व आनंद व्हावा कसा! बाळपणीं मुलीला येऊन जाऊन आरध्य दैवत काय तें आई बाप आईबापांवांचून तिला आवडती व अमोलिक वस्तु सगळ्या जगांत दुसरी मिळावयाची नाहीं, आणि तें ही ठीकच आहे. कारण ज्या आईनें गर्भापासून तिचें आपल्या प्राणांपलीकडे संरक्षण केलें असतें, व जी तिच्या कल्याणाची रात्रंदिवस काळजी वाळ-

गीत असते, अशा त्या दयाळू आईवर मुलीची अतिशय प्रीति असणें साहजीक आहे, आणि कन्येवर आईबापांची आणि त्यांतही विशेषें करून आईची फार प्रीति असण्याचें कारण इतकेंच आहे कीं, तीस घरामध्यें रात्रंदिवस तिचा विरंगुळा असतो. मुलीपेक्षां मुलावर म्हणजे आईबापांची प्रीति कमी असते असें नाहीं. परंतु प्रीति ही निकट संबंधानें जास्त वाढते. याचा अनुभव व्यवहारामध्यें सर्वांस येणारा आहे. स्त्रीपुरुषांमध्यें जो जिवश्चकंठश्च व आमरण स्नेह बनून जातो, त्याचें तरी मूलतत्व हेंच. तेव्हां मुलीपेक्षां मुलाचे वियोगापासून आईला म्हणण्यासारखें वाईट वाटत नाहीं, याचें कारण इतकेंच कीं मुलाला लहानपणापासून विद्येच्या वगैरे संबंधानें आईबापांपासून दूर ठेवण्याचा प्रचार आहे. निदान दिवसांतून त्याचा निमेशिमे वेळ तरी आईच्या दृष्टीआड म्हणजे शिक्षणाचे संबंधानें विद्यालयामध्यें किंवा कोणत्यातरी विद्याभ्यासांत वगैरे जातो. परंतु मुलीचें तसें नाहीं. ती चांगली समजुतींत येऊन नवऱ्याचे घरीं जाईपर्यंत आईला सोडून क्षणभर देखील एकीकडे रहावयाची नाहीं. असा तिचा नित्यक्रम असल्यामुळें आईला तरी तिच्या वांचून कसें चईन पडणार ! मुलाचा वियोग लहानपणापासून थोडा थोडा होत जाऊन पुढें तो जास्त वाढतो, या मुळें

आईला त्याचा एकदम धक्का बसत नाहीं; परंतु मुलगी उपवर होई पर्यंत वाढवून विवाह समारंभांत एकाएकीं तिला अगदीं परक्या एखाद्या मुलाचे स्वाधीन करून त्याजबरोबर लावून देणें हें फार बिकट आहे, व याचे योगानें आईचें अंतःकरण फाटून जाणें अगदीं साहजीक आहे. जशी झाडाला खांदी अगदीं चिकटून असते, तसा आईशीं मुलीचा संबंध असल्यामुळें, ज्या प्रमाणें ती खांदी तोडून नेली असतां तें झाड अगदीं ओकें व उदास दिसतें आणि जाया होतें, तद्वत वरील प्रसंगीं मुलीच्या आईची स्थिति होते.

असो, आतां मुलीचे व मुलाचे बाळपणीं कोणत्या तऱ्हेचे विचार असतात याजबद्दल थोडा विचार करूं. मुलगा सुमारें ५ वर्षांचा झाला ह्मणजे त्याजवर प्रापंचिक बोजा लादण्याची सुरवात होते. ह्मणजे प्रथमतः विद्या, तिच्या सुरवातींतच ज्या रहाटाला त्याला पुढें जोडावयाचें असतें, त्याचे एक एक गुणधर्म त्याचे अनुभवास येऊं लागतात. लोक व्यवहारामध्यें गुंतून जाणें हें त्याच्या विचाराचें पर्यवसान असल्यामुळें जेव्हां या व्यवहाररूपी अफाट दर्याच्या लाटा त्याच्या दृष्टीस पडूं लागतात, तेव्हां यांत आपणास उडी टाकावयाची आहे असें समजून त्याची छाती फाटूं लागते. परंतु वयपरत्वें जेव्हां त्यास असें

समजूं लागतें कीं, या दर्यांतून पार पडण्यास आपणास एका उत्तम स्त्रीरूपी नौकेचें साह्य मिळण्याजोगें आहे, तेव्हां तो ती शोधूं लागतो. पुढें सुदैवानें जर सुंदर अशी नांव त्याच्या हातास लागली, तर ठीकच आहे. नाहीं पेक्षां ती त्यास समुद्रांत उलटी बुडवून टाकिते; किंवा नांव उत्तम असून जर नावाडी अडाणी असेल, तरी ही नाश उभयतांचाच, ह्मणजे संसारांत स्त्री व पुरुष सारखींच दक्ष असलीं पाहिजेत. संसारांतील स्त्रीपुरुषांपैकीं एका व्यक्तीमध्यें जरी न्यूनता असली तरी हाल दोघांचेच. तेव्हां तात्पर्य काय कीं, हे विचार मुलाला अल्पवयांतच कळूं लागतात. परंतु मुलींचें तसें नाहीं. तिला बहुतकरून लहानपणीं गृहस्थितींचें शिक्षण मिळण्याची सुरवात होते; तथापि तो प्रकार नित्यकर्मांतील एक संस्कार असल्यामुळें तिच्या अंतःकरणावर त्याचा फारसा बोजा पडलासा तिला वाटत नाहीं. तशाच प्रकारचें तिचें शिक्षण झालें तरी तें केवळ नीतीचा व धर्माचा उपदेश. लहान मुलींच्या अल्लड वृत्तीचा अनुभव असलेलीं हजारों कुटुंबें आहेत. आह्मीं वर सांगितलेंच आहे कीं, बाळपणचे मुलीचे विचार तिच्या भावी स्थितीशीं फारच भिन्न असतात. लहानपणीं जेव्हां ती आपल्या माहेरच्या मेळ्यांत असते, तेव्हां तिला असें वाटतें कीं, आपला बाबा आणि आई,

आपल्या बहिणी, आजी, काकी, भाऊबंद, शेजारी लोक, व आपल्या सर्व मैत्रिणी हीं जशीं हल्लीं लहान मोठीं आहेत अशींच सर्वदां असावयाचीं. हल्लीं ज्या प्रमाणें आपण हांसुन खेळून व उड्या मारून दिवस घालवतों, व रुसून फुगून आणि हट्ट धरून जसा आईला त्रास देतों, असाच हा क्रम सर्वदां सारखा चालावयाचा. यांत कधीं अंतर पडावयाचें नाहीं. हा एकंदर थाट असाच रहावयाचा असें तिला वाटत असतें. परंतु जसजशी ती मोठी होत जाते, व आपल्या मैत्रिणींचे लग्नसोहाळे होऊन त्या नवऱ्यां बरोबर सासऱ्यास व माहेरास खेपा घालूं लागल्या हें ती पहाते; तसेंच आपल्या शेजार घरच्या लेंकूरवाळ्या झालेल्या मुली, आणि प्रत्यक्ष आपल्या वडील बहिणी आईबापांस सोडून फार दिवस दुसरे घरीं रहातात, त्या परकी मनुष्यांना व लोकांचे घराला माझें घर ह्मणून ह्मणतात व परकी मनुष्यांवर प्रीती करतात, असें जेव्हां ती ऐकते व पहाते तेव्हां तिला हा सर्व प्रकार अजब वाटतो. आणि ज्यावेळीं ती या गोष्टींचा विचार करूं लागते त्या वेळीं तिच्या मनोव्यापारांत फरक पडून तिला वाटूं लागतें कीं, आपली ही हल्लींची अवस्था बदलून जाणार, इतर बायकां सारखा आपल्यास नवरा मिळणार, त्यांच्या प्रमाणें आपणासही

मुलें बाळें होणार, सासूसासरे वगैरे परकीं मनुष्यें आपले घरचीं माणसें होणार, आणि असें झालें ह्मणजे आपणास हें आईचें घर सोडून लोकाचे घरीं रहावें लागणार. या गोष्टीला ढळढळीत उदाहरण तिची आईच होते. ह्मणजे ती आपल्या आईचें घर सोडून येथें येऊन राहिली आहे असा तिला प्रत्यक्ष अनुभव येतो. मानवी प्राण्याच्या आयुष्य मर्यादेंतील अत्युत्तम व अवश्य जो विवाहविधि त्याचा संस्कार मुलाच्या व मुलीच्या आईबापांच्या अंतःकरणांत भिन्न असतो. वर सांगितलेंच आहे कीं मुली प्रमाणें मुलाचा घरांत बाळंदा नसून त्याचा सर्व व्यासंग बाहेर असल्यामुळें त्याचा एकदम वियोग झालासा वाटत नाहीं. तशांत मुलाचे लग्नानें त्याचा आईबापांकडला संबंध व ममता कमी न होतां उलट अधिक ममता वाळगणारीं सोयरीं जोडलीं जातात. तसेंच सून घरांत आल्यामुळें मुलाचे आईच्या विश्रांतीस ती एक जागा होते. मिळून मुलाचे विवाहानें त्याच्या आईला वाईट वाटण्यासारखें कांहीं नसतें.

आतां मुली विषयीं पाहूं लागलें असतां हा सर्व प्रकार अगदीं उलट आहे. जिला लहानपणापासून लाडांची कोडें करून वाढविलें, जिचे हट्ट पुरविण्यांत व नहाण माखण करण्यांत वर्षेंच्या वर्षें घालवून जिला नीट नेटकी व स्वच्छ केली, जिच्यावर अति-

शय प्रीतीनें आईबापांचा अगदीं जीव लागून राहिलेला असतो, जी क्षणभर दृष्टी आड होतांच आईचा जीव घाबरा होऊन लाडके, चिमणे, अशा हांकानीं जिला ती लगेच शोधूं लागते, जरा खोकला किंवा पडसें झालें अथवा किंचित ज्वर आला ह्मणजे आतां कसें होईल अशी चिंताग्रस्त होऊन बिचारी आई जिला नाहीं नाहींते औषधोपचार करूं लागते, जी केवळ झाडाची खांदी किंवा पदार्थाची छाया या प्रमाणें आईला बिलगून राहिलेली असते, जी आईच्या प्रीतीची खाण, आनंदाचें ठिकाण, विश्रांतीचें झाड, व संतोषाचें केवळ मूळ, अशी जी तिला एकाएकीं अपरिचित मनुष्याचे स्वाधीन करतांच तो तिला घेऊन जातो, तिची जन्मा पासूनची सर्व प्रिती एकदम आकर्षण करितो, व आईकडील तिचा अप्रतिम आप्तपणा सोडवून तो आपल्या ठिकाणीं जडवून घेतो. अशा वेळीं त्या बिचाऱ्या आईची काय स्थिती होत असेल बरें ! जी एक रात्र अंथरुणावर नसली तर ज्या आईला झोंप लागत नाहीं, भोजनाचे वेळीं बरोबर नसली तर जिला अन्न गोड लागत नाहीं, व घरांतून क्षणभर नाहींशी झाली तर जी अगदीं वेडाऊन जाते, अशा आईला वरील प्रकारचा वियोग दुःसह होतो.

सुशिक्षण हें पुरुषांना व स्त्रियांनाही अवश्य आहे.

अन्नवस्त्रादिक कित्येक जरुरीच्या गोष्टी जशा उभयतांसही अवश्य आहेत, तद्वत सुशिक्षणही त्यांस अवश्य आहे. सुशिक्षण हें नीतीचें मंदीर, प्रीतीची छाया, सुखाचें साधन, आणि ज्ञानाचें मूळ आहे. तेव्हां तें मनुष्यमात्रास अवश्य आहे असें ह्मणण्यास बाध कोणता? कित्येक पशुपक्ष्यांसही त्याची गरज लागते. मग संसाराचा सर्व बोजा व गृहस्थितीचें सर्व जोखीम संभाळणाऱ्या स्त्रियांना सुशिक्षणाचें किती अगत्य आहे बरें! अलीकडे स्त्रीशिक्षणाचे संबंधानें दोन प्रकारचीं मतें आहेत. कित्येकांचे मतें स्त्रियांना शिक्षण देणें जरुरीचें वाटतें व कित्येकांस तें प्रशस्त वाटत नाहीं. स्त्रीशिक्षणाचे संबंधानें जे नाकें मुरडणारे आहेत, त्यांचें ह्मणणें असें असतें कीं, स्त्रीशिक्षणाचे योगानें साधारण कुलवधूंस भुषणदायक जी लज्जा तिचा उच्छेद होऊन एखाद्या अपंडिते प्रमाणें स्त्रिया बेफाम व स्वच्छंद होतात. सारांश स्त्रीशिक्षणाचे दोन्ही पक्षकार आपापल्या पक्षास साधक बाधक प्रमाणें दाखवून घटकाभर आपल्या पक्षाचा विरुद्ध पक्षावर पगडा बसवितात. पण आमच्या मतें हें द्वैत माजण्याचें कारण उभय पक्षकारांचा शिक्षणाविषयीं गैरसमज होय. स्त्रीशिक्षण व पुरुषशिक्षण हाच मुळीं भेद कसा कल्पितां यावा? शिक्षण तेथून सर्व सारखेंच. तें ज्यांना द्यावयाचें त्यांच्या योग्यतेनुरूप

ठाणे.

असलें पाहिजे. तें पुरुषांना दिलें काय आणि स्त्रियांनां दिलें काय. त्याचें पर्यवसान ज्ञानप्राप्तींत असावयाचें. आतां वरील प्रकारच्या शिक्षणापासून ज्या अपकारक गोष्टी घडतात, त्याचें कारण शिक्षणपद्धतीची व्यंगता होय. पुरुषांना काय व स्त्रियांना काय, सुशिक्षा पाहिजे. त्यांना कांहीं तरी गोष्टी शिकवायाच्या असा संकल्प करून काय उपयोग? कालदेशवर्तमानानुरूप शिक्षण देणें हें शिक्षकाचें मुख्य कर्तव्य आहे. शिक्षणदानांतील व्यंगतेचें अपयश शिक्षकाचे माथ्यावर येईल. त्यांत शिष्यांचा कांहीं अपराध नाहीं. स्त्रिया दुष्कर्मास प्रवर्तणार नाहींत अशा तऱ्हेचें त्यांचें शिक्षण पाहिजे.

---

## लग्न संबंधीं काळजी व लग्नाचा समारंभ.

कन्या हा पदार्थ मोठा चमत्कारिक आहे. हा पदार्थ विकला तर कधीं कधीं याचें पुष्कळ मोल येतें; तरी ज्याची मोल घेण्याची इच्छा नसून ज्याच्या मनांत दान करण्याचें असतें, त्याच्या दानाचा स्वीकार सर्व काळ कोणी फुकट करीत नाहीं. वरदक्षणा पुष्कळ द्यावी लागते. बरें, ती देऊन दान करणाऱ्यास सुख आहे काय? जावयाच्या बापाचें नेहमीं आर्जव करून त्यास नमून रहावें लागतें. पुष्कळ हुंडा घेऊन आणि लग्नांत नानातऱ्हेचा छळ करून विहिणीनें आ-

मच्या कन्येचा आपल्या मुलाकडून स्वीकार करविला हा एक आपणावर मोठा उपकार केला आहे असें समजून तिच्याशीं वर्तणूक ठेवावी लागते. लग्नाचा निश्चय होण्यापुर्वीं हुंड्याबद्दल वगैरे बोलणें चालणें होतें तेव्हां वराच्या बापाची मुखचर्या पहावी. आश्रित किंवा कृपेंतल्या मनुष्यांस जहागिरीचीअथवा इनामाची सनद करून देण्याचा हुकूम करते वेळीं राजाला देखील जितका आपला मोठेपणा वाटणार नाहीं तितका लग्नाला रुकार देण्याच्या प्रसंगीं मुलाच्या बापास वाटतो. त्याच्या तोंडाकडे पाहिलें ह्मणजे "आज मीच काय तो धन्य" अशाप्रकारचे विचार त्याच्या मनांत घोळत आहेत असें भासतें.

जावयास वस्त्राची किंवा अलंकाराची सासऱ्याकडून देणगी यावी अथवा मुलीस स्वतःच्या उपयोगीं पडण्याकरितां माहेरची कांहीं जिनगी मिळावी हा हुंड्याचा मुळचा हेतु असावा. तो हेतु आतां कोणाच्या लक्षांत नाहीं. लग्नाच्या वेळीं मुलगा अज्ञान असतो, याकरितां शरीरसंबंधास रुकार देण्याचें मुलाच्या बापाच्या अगदीं स्वाधीन असतें; हा रुकार विकत घेण्याकरितां जी किंमत मुलीच्या बापास पडते तिलाच हल्लींच्या काळांत हुंडा असें ह्मणतात. मुलाच्या बापाची फक्त हुंड्याकडेसच नजर असली तर मुलीच्या रूपाकडे पाहण्याचें

मुळींच त्याच्या मनांत येत नाहीं. पुढें आपल्या मुलास सुख व्हावें हा या लग्नाचा उद्देश आहे, हें त्याच्या गांवींही नसतें. तूर्त आपला हात चालतो आहे, तों उगवून घ्यावें आणि जितके हुंड्याचे पैसे मिळतील तितके मिळवावे, या गोष्टीकडे काय तें त्याचें लक्ष असतें. कितीएक मुलगे मोठे झाले ह्मणजे ते आपल्या बापांस दुषण देतात. त्यांस हाच अविचार व हीच स्वार्थदिष्टी कारण होय.

लग्नाच्या वेळेस वरपक्षाकडच्या बायकांचा जो थाट असतो तो सांगतां पुरवत नाहीं. वरमाईचा मान आपल्या लोकांमध्यें प्रसिद्धच आहे. विहीणी बाई किती वेळांहसतात, व करवल्या कशा थोड्याच कारणावरून रागावतात, याचें वर्णन करूं लागलों तर थोडक्यांत आटपणार नाहीं. मोठ्या सार्वभौम राजाला मेजवानी करितां घरीं आणलें तर त्याचें विहिणी इतके कोणी गौरव करील किंवा नाहीं या विषयीं आह्मांस संशय वाटतो. फार झालें तर तो ज्या रस्त्यांनीं यावयाचा ते कोणी स्वच्छ करील किंवा त्यांवर पाणी शिंपडील; परंतु विहीणीबाई व त्यांच्या घरच्या बायका यांस चालण्याकरितां वस्त्रांचा रस्ता करावा लागतो. विहिणीस पायघड्यांवरून चालण्याची फार हौस असते. अर्थात

एवढा मोठा मान अशिक्षित स्त्रियांस कसा आवडणार नाहीं ?

वरपक्षाकडील लोकांचा संतोष व्हावा ह्मणून मुलीच्या घरचीं मनुष्यें कितीही झटलीं व त्यांस हसूं न देण्याकरितां त्यांनीं त्यांचें कितीही आर्जव केलें, तरी त्यापासून कांहीं फळ नाहीं. हसवा, व भांडणें, हीं कधीं चुकावयाचीं नाहींत; आणि व्याही शेवटीं असंतुष्ट होणारच. मुलीचा बाप दरिद्री किंवा कंजूष असून त्यानें कांहीं व्याह्याकडच्या मंडळीची हौस पुरविली नाहीं, आणि तो श्रीमंत व हौसी असून त्यानें पुष्कळ खर्च केला, तरी लग्नांत भांडणें होण्याचा संभव सरासरी सारखाच असतो. प्रथम बायका भांडण काढण्याविषयीं मोठ्या तत्पर असतात. सास्वा सुनांचीं, जावा जावांचीं, आणि नणंदा भावजयांचीं भांडणें तर आपल्या लोकांत प्रसिद्धच आहेत. किती एक स्थळीं मायलेकींचीं आणि वहीणी,वहीणींचीं भांडणें देखील कानावर येतात. तेव्हां ज्यांस कलह करण्याच्या कामांत पुरा अभ्यास झाला आहे, अशा बायका, ज्या प्रसंगीं भांडण करण्याचा हक्क वाडवडिलांपासूनच चालत आलाआहे, अशा वेळेस मागेंपुढें कशासाठीं पाहतील! या लग्नांतील भांडणांपासून मुलीच्या बापास कधींकधीं फारच त्रास होतो. व्यही ह्मणतात, " आह्मी जेवायालाच येणार नाहीं" विहीणी-

जाई ह्मणतात "मी पायांपडून घेईन." जांवई ह्मणतात "मला गोफ किंवा कंठी पाहिजे." या सर्वांची समजूत मुलीच्या बापास करावी लागते; कारण कार्य पार पाडून नेण्याची त्यालाच कायती गरज! अलीकडचे सुशिक्षित ह्मणविणारे लोकांच्या घरीं लग्नें होतात, त्यावेळेस ह्मणजे भांडणें कमी होतात असें नाहीं; याचें कारण हेंच आहे कीं, बायकांचें अज्ञान अद्यापि कोठें ही कमी झालें नाहीं. इतर लोकांमध्यें असें आहे कीं, ज्या घराण्यांचा शरीरसंबंध होतो त्यांच्यामध्यें पूर्वींचा स्नेहसंबंध नसला तर नवीन उत्पन्न होतो, आणि पूर्वींचा कांहीं स्नेह असला तर तो अधिक होऊन दृढ होतो. वास्तविकच आहे; शरीरसंबंध आणि खरा स्नेह यांच्यामध्यें कार्यकारण-भावसंबंध स्वाभाविक आहे. कधीं स्नेह शरीरसंबंधापासून उत्पन्न होईल, कधीं शरीरसंबंध स्नेहापासून उत्पन्न होईल. पण आपल्या लोकांमध्यें सर्वच उलटें आहे. व्याह्याव्याह्यांचा पूर्वींचा स्नेह नसला तर शरीरसंबंध झाल्यावर त्यांच्यामध्यें तो उत्पन्न होणार नाहीं. उलटें दोघांमध्यें वांकडें येऊन ते एकमेकांची निंदा करण्यास प्रवृत्त होतात. मुली सासरीं असल्या ह्मणजे माहेरच्यांची निंदा नेहमीं त्यांस ऐकूं येते, व माहेरीं असल्या ह्मणजे सासरच्यांची चर्चा त्यांच्या देखत होते. व्याह्याव्याह्यांचा पूर्वींचा स्नेह असला

तर तो लग्न झाल्यावर अगदीं नाहींसा होतो किंवा निदान पुष्कळ कमी तरी होतो.

आपल्या लोकांमध्यें लग्नांत फार बुडीत खर्च करण्याची चाल आहे, ती अगदीं वाईट आहे. मुलीच्या किंवा मुलाच्या लग्नाच्या वेळेस खर्च करण्यास जवळ पैसा नसला तर आपल्या मिळकतीच्या बाहेर कर्ज काढण्यास कोणी मागें पुढें पाहत नाहीं. ज्याच्या जवळ पैसा असतो तोही खर्च करितो आणि नसतो तो ही करितो. अशा खर्चापासून कोणास कोणत्याही प्रकारचा फायदा नाहीं. लग्नाच्या वेळीं जो उगीच बुडीत खर्च होतो तोच पैसा जर राखून ठेविला तर पुढें पुष्कळ उपयोगीं पडेल. ज्यांच्या लग्नास पूर्वीं हजारों रुपये खर्च झाले, अशा बायका वैधव्य प्राप्त होऊन भिकेस लागल्याचीं उदाहरणें आह्मांस पुष्कळ माहीत आहेत.

ज्यांचें लग्न होतें त्यांस लग्न व्हावयाच्या वेळीं व पुढें कितीएक वर्षे पर्यंत लग्न ह्मणजे काय व तें कशाकरितां केलें, हें समजत नाहीं. सासूला मी जांवयाचें तोंड कधीं पाहीन असें होतें. आपल्या लोकांमध्यें लग्नास फार खर्च होतो इत्यादि गोष्टींस एक मोठा अपवाद आहे तो हा कीं, पन्नास साठ वर्षांच्या तरुण पुरुषाचें आठ दहा वर्षांच्या तरुण मुलीशीं झालेल्या लग्नांस आह्मीं सांगितलेल्या कितीएक

गोष्टी लागू पडत नाहींत. याप्रसंगीं नवरदेवास लग्न ह्मणजे काय हें माहीत होऊन निदान पंचवीस तीस तरी वर्षे झालेलीं असतात व त्याला नवरीचे गुण कळण्याची शक्ति असते. मानापमानांत वगैरे चुकून विहीणीचें मन अस्वस्थ होईल याची भीति नसते; कारण अशा प्रसंगीं विहीणीबाई बहुधा स्वस्थ असतात. भांडणें कांहीं होत नाहींत, कारण उतावळा वर व गुडघ्यास बाशिंग अशी ह्मण आहे ती त्या वेळेस सर्वथैव लागू पडते. लग्नास खर्च फार कमी लागतो. कितीएक प्रसंगीं मुलीच्या बापाचेंही मोठें कल्याण होतें. इतक्या सोई असल्यावर मग एक पोर बुडाली ह्मणून काय चिंता आहे? असो, ह्मातार्‍याच्या लग्नाचें खरें स्वरूप सर्व लोकांस इतकें माहीत आहे व त्यापासून घडणारे अनर्थ इतके वारंवार दृष्टोत्पत्तीस येतात कीं, त्यांविषयीं आतां येथें अधिक लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

आपल्या लोकांत लग्नसंबंधीं ज्या कांहीं चाली आहेत त्यांत पुष्कळ ठिकाणीं सुधारणा करण्यास जागा आहे. त्याठिकाणीं सुधारणा करणें हें काम फार महत्वाचें आहे. यांतील कितीएक सुधारणा करण्यास धर्माचा प्रतिबंध नाहीं. तेव्हां त्या करण्याच्या कामीं झटण्यास सुशिक्षित लोकांनीं आळस करूं नये. लहानपणीं लग्न

करण्याची चाल मोडणें; वधुवरांच्या संमतीनें विवाह योग घडवून आणणें; इंद्व्यास अगर दौलतीस न भुलतां वधुवरांच्या परस्पर वयाकडे, गुणांकडे, व शरीर संपत्ती कडे योग्य लक्ष देणें, आणि अतिशय खर्च, अप्रयोजकमान, निरुपयोगी चाली व निरर्थक भांडणें नाहींशीं करणें, फार कठीण पडेलसें वाटत नाहीं. या कामीं सुशिक्षित व समजूतदार लोकांनीं पहिल्यानें किता घातला पाहिजे. ज्यांस आपल्या धर्माचा प्रतिबंध आहे व ज्यांपासून कांहीं विशेष फायदा नसून अब्रूची, पैशाची, व शरीराची हानि आहे, अशा चाली सुरू करून त्यांस सुधारणा ह्मणण्यापूर्वीं जीं सुधारणेला योग्य स्थळें आहेत, व ज्यांस धर्माचा फारसा प्रतिबंध नाहीं, अशा अवश्य कामीं सुशिक्षित ह्मणविणाऱ्या लोकांनीं नजर पोहोंचविली तर त्यांस तें भूषण आहे.

**प्रकरण ५ वें समाप्त.**

# प्रकरण ६ वें.

---

## सासू आणि सून यांचें वर्तन.

पद---अंजनी गीत.

भरत पुत्र हो तुमच्या माता। स्नुषांलागीं बहु गांजीतां।
दुःखें करिती त्या आक्रांता। नाहीं परिसवतें॥ १॥
काय मुलींचे मायबापतें। तुह्मांसि देती दुहीतें तें। आंदण
देती ह्मणुनि ते। अपराधी होती॥ २॥ ह्मणुनि निशि-
दिनीं सुखवाल्यांना। शांतवीत जा त्या मातांना। विना
यकाची विनती सुजनां॥ जाणाही आहे॥ ३॥

कुटुंबांतील स्त्रियांच्या समुदायांत सासूचें नातें फार वजनदारीचें व श्रेष्ठ असतें. कुटुंबाच्या गृहस्थितीचा सर्व भार बहुधा सासूबाईच्या शिरावर असतो. राजाच्या पश्चात् ज्या प्रमाणें सर्व कारभार युवराजाकडे जातो, तद्वत कुटुंबरूप राज्याचा सर्व कारभार सुनबाईच्या हातांत जावयाचा असतो; तेव्हां आपली सून आपल्यामागें संसाराची सर्व व्यवस्था यथास्थित करील अशा विषयीं सासूबाईनें नेहमीं खबरदारी घेणें फारच अगत्याचें आहे. सुनबाई ही बोलून चालून परक्याची मुलगी आपले घरांत आणून तिला आपल्या घरादाराची व घरांतील दरोबस्त चीजवस्तूची मालकीण करून ठेविली असत्ये. तेव्हां तिणें

नेहमीं आपल्याशीं प्रीतीनें आणि काळजीनें वागलें पाहिजे, अशी जर घरांतल्या मनुष्यांची आणि त्यांतही विशेषें करून सासूची इच्छा असेल, तर तिणें सुनबाईशीं ही सौम्यपणानें व प्रीतीनें वागून तिच्या मनांत कुटुंबांतील मनुष्यां विषयीं पूज्यबुद्धि उपजेल व ती आपला संसार संभाळण्यास योग्य होईल, अशी तजवीज ठेवणें अवश्य आहे. पण अशा सास्वा सांप्रत किती बरें मिळतील ! बहुधा सर्वत्र सास्वासूनांचें भांडण असावयाचें असा साधारण अनुभव आहे. आणि ही परंपरा पूर्वापार चालत आलेली दिसते. सासुनेचे तंट्यामुळें राजघराण्यांतही मोठमोठे अनर्थ घडलेले आढळतात. नारायणरावाचे खुनांतही या सासूपणाचें बरेंच अंग होतें. युरोपियन लोकांत स्त्रियांना जरी पूर्ण स्वतंत्रता आहे, तथापि त्यांच्यांत देखील या सासूपणाची बडिजाव आहेच. आपल्या राणीसरकारला बादशाहीण बनण्याला सुनबाईचे बरोबरीचा मान असण्याची इच्छाच कारण झाली अशी लोकवार्ता आहे.

सासू आणि सून यांजमधील नातें असें कांहीं चमत्कारिक आहे कीं, सासू सद्गुणी, ममताळू, व सुशिक्षित असो; किंवा दुर्गुणी, कैदाशीण, आणि मूर्ख असो; सासूपणाचे जेवढे हक्क व मान मरातब आहेत, तेवढे यथास्थितपणें चालावे अशी तिची इच्छा अ-

सेत; आणि त्यांत जर सुनबाईकडून यत्किंचित अंतर
पडलें तर मग लगेच कलागतीला सुरवात होते.
आतां सुनबाई जर समजूतदार आणि सुस्वभावाची
असली, तर कसल्याही कजाग सासूची तब्बेत राखून
प्रसंग येईल त्या प्रमाणें वागते, परंतु मूर्ख आणि हे-
कड सुनेशीं एखाद्या कज्जेदलाल सासूची गांठ पडली
ह्मणजे त्या कुटुंबांत आकाबाईचा प्रवेश झालाच
समजावा. अशा प्रसंगीं कुटुंबांतील मनुष्यें व
आप्तसोयरीं यांजमध्येंही कलागती लागून या क-
लागतीचा परिणाम मुलगा व सून यांजमध्यें
द्वेष उत्पन्न होण्यापर्यंत जाऊन पोंचतो. शत्रूच्या
ताब्यांतील एखादा किल्ला घेण्याला तोफांच्या भडि-
माराचाही उपयोग होत नसेल, पण एखादें नांदतें
घराणें फोडायाचें झाल्यास सासूसुनांचे भांडणाचे
योगानें हं हं ह्मणतां कार्यसिद्धि होते. पेशव्यांचें थोरलें
नामांकित व पराक्रमी घराणें या तंट्यानेंच रसातळास
मिळालें. ज्या पुणें शहराकडे नुसतें पहाण्याची देखील
जबरदस्त शत्रूची छाती होत नसे, त्या शहरांतील
राजाच्या हाताखालच्या यःकश्चित शिपुर्ड्यानें अंतःपुरांत
शिरून त्याचा प्राण घ्यावा ही गोष्ट सासूपणाच्या भयंकर
दुस्वासाची परिणाम नव्हे काय!! या सासूच्या कजागप-
णांत विशेष आश्चर्य मानण्याजोगी गोष्ट ही आहे
कीं, पुढेंमागें आपल्या सर्व कुटुंबाची सत्ता सुनबाई

हातांत जाऊन वृद्धापकाळीं आपल्यासही तिचेच हाताखालीं दिवस काढावयाचे आहेत, असें सासूबाई जाणत असतांही आपल्या अधिकाराचा गैर उपयोग करून कुटुंब कलहाचें आदिकारण बनतें. मुलाचें लग्न होऊन आपल्यास सासूपणा यावा ह्मणून स्त्रिया इतक्या आर्त झाल्या असतात कीं, लग्नसमारंभांत एकदां सुनमुखाचा सोहाळा केव्हां होईल, अशी सासूबाईंना मोठी उत्कंठा असते. पण या सुनमुखाचा आनंद टिकणारीं कुटुंबें फारच थोडीं मिळतील. कित्येक कुटुंबांत तर हें सुनमुख कांहीं दिवसांनीं सासूबाईच्या दुर्मुखपणाचें प्रमुख कारण होतें. आतां या कामीं केवळ सासूलाच दोष देतां येत नाहीं. कांकीं कित्येक सुनाच छांदिष्ट, मूर्ख, व हेकड असतात. पण तसें असलें, तथापि सासूला फारच सौम्यपणा पत्करावा लागतो. अलीकडे लहानपणीं लग्नें करण्याची जी दुःखकारक चाल पडली आहे व सुनेला सासरीं वागविण्याची सांप्रत जी चमत्कारिक रीती आहे, त्यांचे योगानें अल्पवयस्क सुनबाईला सासर ह्मणजे केवळ कैदखाना असें वाटत असतें. आपल्या लाडक्या कन्येचा विवाह करून तिला परगृहीं पाठविण्याचें कारण तिला पतिसहवास घडावा हें होय. सासू, सासरा, दीर, जावा, नणंदा वगैरे सर्व नातीं पतीच्या अंगभूत होत.

मुलीचा बाप आपल्या मुलीचें संरक्षण करून तिला सुख देण्याविषयीं कांहीं मुलीच्या सासूबाईची प्रार्थना करीत नाहीं. या बाबतींत यथाशास्त्र रीतीनें सर्व प्रकारें जांवईबोवांचीच प्रार्थना करावयाची असते. परंतु जेथें नवरदेव अल्पवयस्क किंवा जराग्रस्त असतात, तेथें मुलीच्या संरक्षणाची निरवानिरव घरच्या कोणातरी वडील माणसांशीं करणें भाग आहे. आणि यामुळेंच सुनबाई सर्व प्रकारें आरंभीं सासूबाईच्या ताब्यांत जाते. अशा स्थितींत सुनबाईला संसाराची काळजी कितपत असणार, हें उघड आहे. या करितां सासरचीं सर्व मनुष्यें आपलीं आहेत, नवरा हा आपला जन्माचा सोबती आणि सुखदुःखाचा भागीदार आहे, सासू सासरा वगैरे वडील मनुष्यें जो व्यवसाय आणि खटाटोप करीत आहेत, तो केवळ आपल्या सुखा करितां आणि कल्याणा करितां आहे, अशी सुनबाईची बुद्धि होण्या जोगें सासूचें तिच्याशीं वर्तन पाहिजे. आतां दुर्दैवानें सून अशा प्रकारची सुशील मिळाली नाहीं, तथापि तेवढ्यानें लगेच नाखूष होऊन तिच्याशीं तंटा करण्यांत अर्थ नाहीं. होईल तों पर्यंत तिला सौम्यपणानें ताळ्यावर आणण्याचा यत्न करणें हेंच सासूचें कर्तव्य होय.

सुनबाईशीं दुस्वास करणें हें आपल्या व आपल्या मुलाच्या संसाराचा नाश करण्यासारखें आहे. अशा

तऱ्हेनें आपण होऊन आपल्याघरावर अग्नि ठेवणें हें शहाणपण नाहीं व समजूतदार स्त्रियांस योग्य नाहीं. सुनबाई अल्पवयामुळें सासूच्या उपदेशाची योग्यता समजत नसली, तथापि सासूबाईनीं तेवढ्या मुळेंच निराश होऊं नये. पोरकटपणामुळें सुनबाईला सासरच्या घराची आस्था नसते हें खरें, पण पुढें वयांत येऊन चारमुलेंबाळें झालीं म्हणजे पुष्कळ द्वाडसुना जरबेस येऊन सासूबाईच्या अध्यर्यावचनांत वागूं लागल्याचीं पुष्कळ उदाहरणें दृष्टीस पडतात. या करितां सासुबाईनीं उतावळी न करितां जेणें करून आपल्या मुलांचें व नातवंडांचें कल्याण होईल अशा रीतीनें कुटुंबांतील सर्व मनुष्यांशीं व त्यांत विशेषें करून अल्पवयस्क सुनांशीं शांतपणानें, प्रीतीनें आणि सभ्यरीतीनें वागून सासूपणाचा बोज राखावा. हेंच सुशील सास्वांचें कर्तव्य होय.

**प्रकरण ६ वें समाप्त.**

# प्रकरण ७ वें.

---

## बालकांचें योग्य पालन.

कामदा

राग अलैया बियावल ताल धुमाळी. (फरफरां नको) या चा.

शिक्षणामुळें कीर्ति ती मिळे ।
त्या विणें दुजें सर्व आगळें ।
वृद्धि पावतो या जगीं खरा ।
मार्ग त्याहुनी नच दिसे बरा ॥

चांगल्या शोधावरून असें समजून येतें कीं, बहुत करून सर्व देशांमध्यें जीं मुलें होतात, त्यांमधून बहुत करून निमे पांच वर्षांचे पूर्वींच मरतात. ह्या गोष्टीचा बारीक व पुरतेपणीं विचार करून पाहिला असतां असें समजून येणार आहे कीं, मुलें उपजल्याचे पूर्वीं त्यांच्या आयांनीं व पुढें दायांनीं कसें वागावें व मुलांचा कोणत्या रीतीनें कसा सांभाळ करावा हें त्यांस समजत नाहीं. आणि हें न समजल्यापासून लहान लहान मुलें किती मरतात, व त्यांतून जीं वाढतात तीं मोठेपणीं कोणत्या प्रकारचीं मनुष्यें होतात, हें तर उघडच आहे. त्यांची शरीरप्रकृति सदा सर्व-काळ बिघडलेली, स्वभाव खराब, व आचरण दुष्ट; सारांश हीं मुलें लहानपणीं आयांपासून बिघडून पुढें

मरे तोंपर्यंत दुःख पावतात, हा सर्व आयांकडे दोष आहे, यांत संशय नाहीं. याकरितां आईनें कोणत्या रीतीनें वागावें याविषयीं विचार केला पाहिजे. लहान मुलांची शरीरप्रकृति चांगली असावी म्हणून आईनें तीं उपजल्याच्या पूर्वीं व नंतर कांहीं दिवसपर्यंत बेतानें जेवावें, शरीरश्रम थोडे करावे, व काळजी फार थोडकी बाळगावी; मुलांस आईचें दूध असल्यास तीं चांगलीं वाढतात, आणि तेणेंकरून परस्परांमध्यें प्रीति वृद्धिंगत होते. कधीं कधीं असें घडून येतें कीं, दूध पाजणारी ठेवणें अवश्य पडतें. तेव्हां दूध पाजणारणीची शरीरप्रकृति चांगली असावी, व ती मुलाचे आईच्याच वयाची, तितकेच दिवसांची बाळंत, व सुस्वभावाची असली पाहिजे. मुलांना पहिल्यापासून नेमलेल्या वेळीं दूध पाजावयाची संवय ठेवावी. पहिल्या महिन्यामध्यें प्रत्येक दोन तासांनीं पाजावें, व नंतर तीन किंवा चार तासांनीं पाजावें. आईस दूध फार असलें तर मुलांना थोडेंच पाजावें; लहान मुलांचे पोटा भोंवतालें फडकें सैल बांधावें; गाईचें किंवा दूधपाजणारीण ठेवलेली असेल तिचें अन्न साधें व पुष्टकारक असावें, तिणें दारू किंवा दारूसारखे दुसरे मादक पदार्थ सेवन करूं नयेत. मुलांना आईचें किंवा दूधपाजणारीण ठेवलेली असेल तिचें दूध जसजसें मिळेनासें होतें, तसतसें त्यांस थोडथोडें अन्न घालणें अवश्य पडतें.

तेव्हां आईबापांनीं पहिल्यापासून खबरदारी ठेवावी. रोग आईबापांपासून उत्पन्न होतात. कांहीं त्यांच्या हयगईमुळें होतात. कुबड व अशा प्रकारच्या दुसऱ्या खोडी, मुलें पडलीं अथवा बेसावध असलीं म्हणजे होतात; अगर त्यांचीं लहानपणचीं कोंवळीं हाडें मुरगळून हयगईमुळें अथवा आंतलीं वस्त्रें घट्ट घातल्यामुळें उत्पन्न होतात. मुलांनीं रात्रीं आंगावरचीं वस्त्रें काढून ठेविल्यानंतर आईनें त्यांस बसावयास, उठावयास, लोळावयास, उड्यामारावयास सांगावें व आपण लक्ष्य लावून त्यांचा हात, पाय, चमकत नाहींसें पहावें. मुलें निजलीं असतां त्यांचे एके बाजूस दिवा ठेवितात व तीं, जागीं झालीं असतां त्यांच्या डोळ्यांपुढें टोप्यांचे गोंडे लोंबतात तेणेंकरून तीं तिरवीं पाहूं लागतात. तर अशा गोष्टींकडे ध्यान ठेवणें अवश्य आहे. जी गोष्ट आपल्यास समजत नसेल ती वैद्यास विचारावी.

लहान मुलांची प्रकृति नीट राखण्याकरितां कांहीं कांहीं मुख्य नियम सांगितले. तीं बरीच मोठीं झाल्यानंतर सुस्वभावाचीं व्हावीं या विषयीं विचार—

मुलांस समजूं लागलें म्हणजे त्यांस बऱ्यावाईट इच्छा उत्पन्न होतात. ज्या त्यांस व दुसऱ्यांस हितावह असतील त्यांची त्यांस संवय लावावी आणि ज्या वाईट असतील त्या अगदीं काढून टाकण्याचा प्रयत्न करावा.

मुलांचा मारामारी करणें, चोरणें, त्रास देणें यांकडे पहिल्यापासून फार कल असतो. आईबापांनीं त्यांस चांगले गुण शिकवावे. लहानपणीं एखादा वाईट गुण किंवा संवय लागली तर ती मोठेपणीं नाहींशी करणें कठीण. मुलांना धाकानें शिकविण्यापेक्षां गोडीनें शिकाविणें बरें. कोणतीही गोष्ट गोडीनें होते त्याप्रमाणें धाकानें होत नाहीं. मुलांस युक्तीनें शिकवावें; त्यांस चांगलें शिकविण्याकरितां थोडी शिक्षा करावी; कारण धमकावणीनें शिकवूं लागलें तर त्यांच्या रागाची उठावणी होते, मग तीं ऐकत नाहींशीं होतात. बाबा, उगीच बस, रडूं नको. असे शब्द मायेनें बोलावे. मुलांचे कांहीं लाड करणें, नंतर त्यांस मारणें अशा रीतीनें त्यांवर धाक बसणार नाहीं. मुलें प्रथमतः सुस्वभावाचीं असतात, त्यांस आईबापच बिघडवून टाकितात. त्यांच्या बरोबर त्यांनीं पहिल्यापासून योग्य रीतीनें वागावें; त्यांस दिवसभर शिकायास लावूं नये. थोडकीशी वेळ खेळण्याकरितां द्यावी व त्यांची सुधारणा होईल असे त्यांस खेळावयास पदार्थ द्यावे.

योग्य शिक्षा—आतां अशा प्रकारें वाढलेल्या मुलांस लहानपणापासून नीति व विद्या कशी शिकवावी, तीं कोणत्या रीतीनें वागलीं असतां पुढें त्यांचें कल्याण होईल, व कशीं वागलीं असतां अनहित

होईल, त्यां मध्यें वाईट व चांगले गुण कोणते, ह्याविषयीं, व त्यांमध्यें ज्या वाईट खोडी असतील त्या युक्तीनें नाहींशा कराव्या व जे चांगले गुण असतील ते त्यांमध्यें अधिक चांगले होऊन त्यांचें पुढें बरें होईल असें करण्यास काय काय युक्ति योजाव्या, ह्या विषयीं विचार करणें योग्य आहे. या कारणास्तव आई किंवा दाई, जिच्या हातामध्यें लहानपणापासून मुलें असतात, तिनें या विषयाकडे चांगलें लक्ष लावून पुढील सर्व मजकूर ध्यानांत ठेवावा.

ही गोष्ट आईनें व दाईनें पक्की ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, मुलांचा लहानपणापासून चोरी करणें, शिव्या देणें, दुसऱ्याची उगीच थट्टा करणें अशा अनेक खोडींकडेस कल असतो. आणि कधीं कधीं जे कोणी त्यांच्या फार उपयोगीं पडतात, त्यांवर रागावूं नये, त्यांवर प्रीति करावी असेही चांगले गुण त्यांच्या मध्यें आहेत, असें आढळतें. मुलांमध्यें जे जे वाईट गुण असतील ते काय कामाचे? अशा प्रकारचे गुणांनीं त्यांची फजिती होते एवढेंच नाहीं. त्यांचे वडिलांची तर मोठीच फजिती!! लोक त्यांच्या वडिलांवर दोष ठेवितात व कांहीं त्या मुलांचे जवळचे सोयरेधायरे असतात ते त्या वडिलांच्या नांवानें हाका मारीत असतात, आणि शेवटीं तीं मुलें मोठीं मूर्ख वाढलीं ह्मणजे तींच व-

डिलांच्या नांवानें रडतात! कांहीं ह्मणतात "आह्मीं लहानपणापासून आईबापांचें ऐकिलें नाहीं म्हणून आतां आमची अशी दशा!" दुसरीं कांहीं मुलें ह्मणतात कीं, आमचे आईबाप मूर्ख होते, त्यांनीं आम्हांला शिकविण्यास दमडीही खर्च केली नाहीं; आम्ही जशीं खेळलों तसें आम्हांस खेळूं दिलें.

खोडी व वाईट गुण मुलांमध्यें नसावे ह्मणून पहिल्यापासूनच त्या मुलांचे लाड करूं नयेत. त्यांचे वाईट गुण असतील त्यांचा प्रतिबंध लागलाच करावा; पण ते वाईट गुण काढण्यास मार, काठी इत्यादि साधनांचा उपयोग करूं नये. त्यांस शिकविण्यास पहिल्यापासून हुशार बायको किंवा कोणी नीतिमध्यें हुशार मनुष्य पाहून त्याचे हातामध्यें ठेवावें. मूर्खांच्या स्वाधीन त्यांस केलें तर काय कामाचें ? तेणें करून दुप्पट तोटा. त्यामुळें त्यांच्यामध्यें वाईट गुण उत्पन्न लहानपणापासून होतात, आणि असे गुण एकदां त्यांच्यामध्यें उत्पन्न झाले ह्मणजे ते नाहींसे होणें महा कठीण. कधींकधीं त्यांच्यामधील वाईट गुण नाहींसे होतात खरे, परंतु वर्षांचींवर्षें लागतात. पुढें कांहीं प्रकरणें सांगितलीं आहेत, त्यांकडे फार लक्ष लावावें. लहान मुलांस जर एखादी वस्तु पाहिजे असली तर ती रडावयास लागतात, त्यांना एकदां दोनदां ती वस्तु दिली ह्मणजे त्याप्रमाणेंच तीं

मुलांस प्रथमतः अन्न सोसतें किंवा नाहीं हें पाहण्याकरितां तें दिवसास घालावें. कारण अशा नियमानें फारच फायदे होतात. कधींही तें जडान्न नसावें; जर तें अन्न मुलांस सोसलें नाहीं, तर त्यांस अरारूट अथवा पेज अथवा भाताचा कुवळ इत्यादि हलकें अन्न घालावें, नाहीं तर वैद्याला विचारावें. मुलांना जें अन्न घालावयाचें तें कढत असूं नये. कारण, त्यापासून हित न होतां अनहित होतें. मुलांना अन्न घातल्यानंतर उभें धरावें.

वेताबाहेर मुलांस पाजणें व अन्न घालणें यांपासून अनेक रोग होतात. मुलें उपजल्यावर कांहीं दिवस पर्यंत त्यांस काळजी, आशा, निराशा, भय, व ज्यांपासून मनुष्यास रोग होतात, असे जे मनोधर्म ते नसून त्यांस दुखणें मात्रच असतें; तर हें दुखणें वेताबाहेर अन्न खाण्यापासून असावें, असें दिसतें. म्हणून अधिक घालूं नये. मूल निजत नसलें म्हणजे कांहीं बायका त्यास अफू किंवा अफूसारखे दुसरे कैफ आणणारे पदार्थ घालितात मुलास त्या कैफापासून कांहीं उपद्रव न होतां झोंप मात्रच चांगली लागते, असें त्या समजतात. असें कधीं करूं नये; तेणेंकरून मुलांस फार इजा होते एवढेंच नाहीं, तर त्यास लहानपणापासून अफू खाण्याची संवय लागते. ती संवय मोठेपणीं काढून टाकणें कठीण पडतें.अशीं कांहीं उदा

हरणें आढळतात कीं, या कैफानें मुलेंही मरतात. मुलास सकाळीं पाजल्यावर लागेल तेवढी झोंप घेऊं द्यावी; व उठल्यानंतर पुनः पाजावें; रात्रीमध्यें मुलें दोन तीन वेळां उठतात तेव्हां त्यांस पाजावें. सारांश, मुलांस चांगल्या तऱ्हेनें वाढविणें आईकडेसच आहे.

निद्रा.—पाळण्यांत घालून झोंपा काढिल्या शिवाय व थोपटल्या शिवाय मुलांनीं निजावें हें वाचकांस फार आवडतें, व अशी संवय लहान मुलांस असल्यास फार चांगलें. मुलें निजण्याचे पूर्वी त्यांचे हात, पाय, तोंड, इत्यादि शरीराचे अवयव गरम नसले तर त्यांस चांगली झोंप लागत नाहीं. त्यांना निजवितेवेळेस त्यांच्या डोक्याकडचा बिछान्याचा भाग उंच असावा. त्यांच्या आंगावर पांघरुण घालावयाचें तें सैल असावें; मुलें जागीं झालीं ह्मणजे त्यांस कडेवर लागलेंच घेऊं नये. त्यांना थोपटून निजविण्याचा यत्न करावा. सारांश, विचार, ज्ञान, व युक्ति, यांच्या योगेंकरून जसें चांगलें दिसेल तसें करावें.

वस्त्र.—मुलांस गरम राखण्याकरितां त्यांच्यावर तीन चार पांघरुणें घालूंनयेत. वरून साध्या कापडाचा झगा व आंतून बंडी घालावी. गरीबगुरिबांचीं मुलें, ज्यांस नानातऱ्हेचे, उवा, खरूज इत्यादि रोग उत्पन्न होतात ते होऊंनयेत ह्मणून मुलांस स्वच्छ राखावें.

मुलांची शरीरप्रकृति स्वच्छ असावी याकरितां दिवसांतून त्यांस दोनवेळां आंघोळ घालावी, कारण शरीराच्या छिद्रांतून कांहीं घाम वगैरे येत असतें, तें जर धुऊन काढिलें नाहीं, तर तेणेंकरून छिद्रें बंद होऊन त्यापासून नाशकारक परिणाम होतात. मुलांस कधीं कधीं अशीं दुखणीं येतात कीं, तेणेंकरून तीं ठार मरतात. पूर्वीच्या लोकांचें मत असें असे कीं, मुलांना थंड पाण्यानें आंघोळ घातली तर तीं बळकट होतात. परंतु तें सर्व खोटें. मुलांस आंघोळ घालते वेळेस तीन तीनदां उठावयास न पडावें ह्मणून ज्या वस्तु पाहिजेत, त्यांची पुर्वीच तयारी करावी, आणि त्यांचे अवयव स्वच्छ धुवावे.

मुलांस स्वच्छ व निरोगी राखण्याकडे नीट लक्ष लाविलें पाहिजे. ज्या प्रमाणें मोठ्या मुलांस स्वच्छ हवा व व्यायाम अवश्य आहे, त्या प्रमाणें लहान मुलांसही आहे. बसावयाच्या व निजावयाच्या खोल्या, व खिडक्या कांहीं वेळ उघड्या ठेवाव्या. जसजशीं मुलें मोठीं होतात व त्यांस आपोआप उठण्याची संवय होते, तसतसा त्यांस आनंद वाटतो. मुलें आपोआप सांवरूं लागलीं ह्मणजे त्यांना अंगावर घेण्याची फार संवय लावूं नये. त्यांस खालीं बसवून त्यांच्यापुढें खेळण्याचे पदार्थ ठेवावे हें फार चांगलें, व तेणेंकरून बायकांसही वेळ सांपडतो. एकाद्या गरिबाच्या बायकोनें मुलाला

घेण्याची फार संवय केली तर तिजपासून मोठी फजि-ती होते. तिला काम करण्यास बनत नाहीं. तिनें मुलास टाकून धंदा केला तर मुलाची हेळसांड होणार! आपो आप खेळण्याची संवय करणें यांत दुप्पट फायदा आहे.

मुलांना अशा योग्य प्रकारें वागविलें असतां त्यांची प्रकृति चांगली राहून रोग इत्यादि पीडा त्यांस होणार नाहींत. जर कधीं प्रकृतीचें मान बिघडलें तर तें वाईट तऱ्हेच्या अन्नापासून बिघडतें. जर दुखणें मोठें नसलें तर उन्हा पाण्याच्या आंघोळीनें नाहींसें होईल. पुळ्या वगैरे प्रकारचीं दुखणीं असलीं तर उन्हा पाण्याची आंघोळ घालूं नये.

मुलींपेक्षां मुलांस फार जपलें पाहिजे. मुलगे रडतां रडतां एखादे वेळेस जसे गुदमरतात तशा मुली गुदमरत नाहींत. ही होष्ट आंघोळीच्या वेळीं फार होत असते. या करितां तेसमयीं फार जपावें.

देवींपासून पूर्वी मुलांचा फार नाश होत असे, परंतु नवीन शोध झाल्यावर त्या रोगाची कमताई फार झाली. आईबापांनीं ही गोष्ट पक्की ध्यानांत ठेवावी कीं, मुलांना महिन्याच्या आंत देवी काढवाव्या; अ-ज्ञानी लोकांची समजूत आहे कीं दैवीं असेल तें होईल. देवी काढून काय होणार आहे ? तर असें त्यांचें ऐकूं नये. देवी काढणें अवश्य आहे. व्यंगता आणि खोडी बहुतकरून मूल उपजल्यानंतर होतात.

दुसऱ्या वस्तु पाहिजे असल्यास रडूं लागतात. असली वाईट खोड असतां असतां फार वाढते. त्यांचे अशा प्रकारचे लाड अगदीं करूं नयेत, ह्मणजे त्यांच्या खोडी नाहींशा होतील.

सहनशीलता, सुस्वभाव, मायाळू शब्द, यांहींकरून आईबापांनीं लहान मुलांस असें कळवावें कीं, अमूक वस्तु त्यांच्या कामाची नाहीं; तेणेंकरून त्यांचा फार तोटा होईल. त्यांना त्यांणीं हळू हळू असें सुचवावें कीं, इंद्रियदमन ह्मणुन जी सर्वांमध्यें शक्ति आहे ती वाढवावी. कांहीं खोडी कांहीं मुलांमध्यें वंशपरंपरे पासून असतात. तर अशा प्रकारच्या खोडी नाहींशा करण्या करितां जेवढा उपाय असेल तेवढा करावा. मारामारी करणें, चोरी करणें इत्यादि वाईट खोडी मुलांमध्यें असतात, परंतु त्या माराच्या साधनानें नाहींशा करण्याचा प्रयत्न करूं नये. त्यांस जें कांहीं शिकविणें तें प्रीतीनेंच शिकवावें, आणि प्रीतीनें शिकविलें असतां तीं शिकतील. कितीएक अज्ञानी आईबापांची अशी समजूत असते कीं, मुलांस मारण्याचा धाक घातल्या शिवाय शिकविणें हें व्यर्थ. परंतु लहान मुलांबरोबर अशा प्रकारच्या वर्तणुकेच्या योगें फारच वाईट परिणाम होतात. असे जे कांहीं वाईट प्रकारचे परिणाम होतात, ते सर्व ह्या आईबापांच्या मुळेंच होतात, असें समजावें. कितीएक आईबापां-

ची अशी चाल आहे कीं ते आपल्या मुलांचे लाड फार करितात आणि त्यांस वाईट शब्द, शिव्या देणें इत्यादिक स्वतःच शिकवितात, मग ते शब्द तीं मुलें ह्मणूं लागलीं ह्मणजे त्यांस मारूं लागतात. तर ह्या सर्व वाईट खोडी मुलांस लागूं नयेत, हें सर्व आईबापांकडेसच आहे. या विषयीं अधिक सांगण्याची गरज नाहीं.

मुलें लहानपणापासून खोटें बोलत नाहींत, त्यांना लहानपणीं शिकवावें तसें तीं शिकतात. त्यांना लहानपणापासून खोटें बोलण्याची संवय लागली ह्मणजे मग तीं खोटें बोलूं लागतात. तर कदापि असें करूं नये. त्यांमध्यें सत्य ह्मणून जें कांहीं आहे त्याची पहिल्यापासून संवय ठेवावी; ह्मणजे एकादा वेळीं जर तीं खोटें बोललीं तर कबूल करितात. घरांतील सर्व मनुष्यें, मुख्यत्वेंकरून चाकर माणसें इत्यादि, मुलें निजत नसलीं किंवा रडत असलीं ह्मणजे "बागुल आला" अशा प्रकारचें भय दाखवितात; पण येणें करून मोठमोठे वाईट परिणाम होतात. अशा प्रकारचें त्यांस उगीच भय घालणें हें अगदींच वाईट. मुलांनीं निजावें आणि रडूं नये या कारणास्तव हे बाऊ इत्यादि भय घालितात, असें मुलांस एकदां समजलें ह्मणजे मग तीं घरांतील मनुष्यांचें किंवा चाकरांचें बोलणें खोटें आहे असें मानूं लागतात. आणि

मग त्यांचा त्यांच्या वरचा विश्वास जाऊन तीं अगदींच ऐकत नाहींशीं होतात.

लहान मुलें दुसऱ्या मुलांचे वाईट गुण पाहून आपण त्यांप्रमाणें शिकतात. आईबाप पहिल्यापासून आपल्या मुलांचे लाड करूं लागले ह्मणजे तीं त्यांची आज्ञा मानीत नाहींत; आणि मुलें अशा प्रकारचीं झालीं ह्मणजे मग त्यांस खेद व पश्चात्ताप फार होत असतो. मुलांनीं त्यांच्या वचनामध्यें रहावें याकरितां त्यांणीं पहिल्यापासून त्यांस रीति लावावी; जर त्यांणीं अवज्ञा केली तर त्यांस असें करूं नये ह्मणून शिकवावें; ह्मणजे खचित तीं मुलें वाईट होणार नाहींत, आईबापांच्या आज्ञा मोडणार नाहींत. तसेंच कांहीं मुलें पुढें निष्ठुर फार होतात, माशा व दुसरे कांहीं जीव जंतु दृष्टीस पडतांच त्यांस मारूं लागतात, तर ह्या खोड्या त्यांच्यामधून घालविणें अवश्य आहे. अशा प्रकारचा कल नाहींसा करून टाकणें आईबापांकडेसच आहे. त्यांस जें चांगलें तेंच शिकवावें. जेणेंकरून त्यांची सुधारणा होईल अशा तऱ्हेचेच त्यांस खेळायास खेळ द्यावे. त्यांस कुत्रीं मांजरें, घोडीं, गाई, पक्षी इत्यादि प्राण्यांचीं चित्रें द्यावीं आणि त्यांस त्यांची कोणत्या रीतीनें जतन करावी हें सांगावें व त्यांस खाण्याकरितां गवत, दाणे इत्यादि घालण्यास शिकवावें.

ज्याप्रमाणें मुलें कोणतीही गोष्ट करतांना पहातात त्याप्रमाणेंच तीं करितात; ह्मणून आईबापांनीं त्यांच्याबरोबर चांगल्या रीतीनें वागावें ह्मणजे मुलेंही पुढें सहसा दांडगीं, द्वाड निपजत नाहींत.

द्वाडपणा करणें, सूड उगवणें इत्यादि प्रकार लहान मुलांच्या दृष्टीसमोर करूं नयेत, कारण मग तीं या प्रकारचेच वाईट गुण शिकतात. तर अशा प्रकारचे गुण त्यांच्यामध्यें उत्पन्न होऊं नयेत ह्मणून आईबापांनीं फार खबरदारी ठेवावी. मुलें लहान पणीं दरवाजावर किंवा जमिनीवर पडलीं म्हणजे रडूं लागतात. तीं रडूं नयेत म्हणून "जमिनीनें किंवा दरवाजानेंच तुला मारलें, तूं त्याला मार" असें त्यांस आईबाप सांगतात. पण अशा सांगण्यापासून त्यांस सूड उगविण्याची संवय लागते. त्यांणीं क्षमा करावी, आपल्यास दुःख झालें असतां दुसऱ्यांस दुखवूं नये, आणि सर्वांवर प्रीति ठेवावी, असें त्यांस ( मुलांस ) शिकवावें.

लहान मुलांनीं कोणत्या एखाद्या वस्तूकडे पाहिलें म्हणजे त्यांस आनंद वाटतो. त्यांची करमणूक होऊन त्यांस आनंद वाटेल अशा प्रकारचे खेळ द्यावे. दोन वर्षांपासून सहा वर्षांचे मुलांस कागद, लेखणी, दौत, देऊन कागदावर रेघा काढण्यास शिकवावें. त्यांस कुत्रे, गाई, घोडे, आणि

नानाप्रकारच्या पक्ष्यांचीं चित्रें देऊन त्यांस(जनावरांस) पाणी पाजावें, चारा घालावा इत्यादि शिकवावें. तसेंच त्यांणीं तीं चित्रें टाकूं नयेत, त्यांस मारूं नये, तीं फाडूं नयेत; असें शिकविण्याच्या योगानें पुढें वास्तविक ज्या प्राण्यांचीं तीं चित्रें असतील त्यांजवर तीं प्रीति फार करितील व आपले जवळच्या शेजारी व दुसऱ्या लोकांवर फार ममता करितील. मुलींस लहानपणापासून बाहुल्या खेळण्याकरितां द्याव्या, कारण या खेळानें त्यांची पुढें मुलांवर भक्ति चांगली बसते, त्यांस आवडेल तो खेळ चांगल्याप्रकारचा नसला तर त्या मुलीपुढें मोठ्या झाल्या ह्मणजे दांडग्या आणि द्वाड होतात.

मुलांस व मुलींस मेलेलीं जनावरें, मेलेले पक्षी दाखवूं नयेत, कारण मग त्यांस दुसऱ्यांचे हाल पाहून दुःख वाटत नाहीं. दुःख आणि सुख हें बहुतकरून सारखेंच, यांत भेद नाहीं असें त्यांस वाटूं लागतें.

मुलांनीं लहानपणापासून आपले हात, तोंड वगैरे धुऊन स्वच्छ रहावें अशी त्यांस संवय लावावी; तसेंच पहिल्यानें भात आणि भाजी, नंतर भाकर किंवा पोळी खावी अशी त्यांस जेवणाची संवय लावावी. असें न शिकविलें तर कित्येक मुलें सर्व भात भाजी इत्यादि पदार्थ एकेठिकाणीं करून जेवि-

तात; परंतु तें अगदीं वाईट; ह्मणून अशाप्रकारची संवय मोडून टाकावी.

मुलांस त्यांचे हिताची गोष्ट सांगावयास लागलें ह्मणजे त्यांस पहिल्यानें वाईट वाटून तीं रडूं लागतात, परंतु असले प्रकार मनांत आणूं नयेत. त्यांना लहानपणापासून मोठेपणा, सभ्यपणा, नीति इत्यादिक शिकवावें, आणि अशाप्रकारचें शिक्षण उदाहरणें देऊन द्यावें. अशाप्रकारें आईबापें आपल्या मुलांबरोबर वागलीं असतां तीं मुलें कधीं वाईट निपजावयाचीं नाहींत.

मुलांच्या युक्ति व चांगले गुण वाढावे ह्मणून कांहीं मुलांस एके ठिकाणीं जमवावें; ह्मणजे तेणेंकरून त्यांस ज्ञान लहानपणापासून बरेंच होईल. मात्र आईबापांनीं त्यांजवर देखरेख ठेवली पाहिजे; कारण निरनिराळ्या स्वभावाचीं मुलें एकेठिकाणीं जमलीं ह्मणजे त्यांतील कितीएक चांगलीं व कितीएक वाईट असतात. आईबापांनीं आपल्या मुलांस कधीं कधीं शेतामध्यें किंवा बागेंत घेऊन जावें. आणि त्यांस निरनिराळ्या प्रकारचीं फुलें व फळें दाखवावीं व अमूक जनावरें मनुष्याचे उपयोगीं फार पडतात, आकाशांतील तारे हा ईश्वराचा केवढा चमत्कार आहे, हें सर्व त्यांस सांगावें. त्यांना एवढ्या वयांत अशाप्रकार-

ची माहिती असली ह्मणजे ह्या विषयांची अधिक माहिती व्हावी अशी मोठेपणीं उत्सुकता होईल.

मुलांना लहानपणापासून शाळेंत घालावें. कोणी कोणी लोक असें ह्मणतात कीं लहानपणापासून ह्मणजे ज्यावेळीं मुलांस समजही नसतो, तेव्हांपासून तीं काय शिकतील? पण असें म्हणणारांस कांहींच या प्रकरणाविषयीं समजत नाहीं असें आह्मांस वाटतें. कारण मुलांस लहानपणापासून शाळेंत घातलें ह्मणजे त्यांस शाळेंत जाण्याची संवय लागते, नाहीं तर तीं मोठेपणीं शाळेंत जाण्यास कुरकुर करूं लागतात. मुलांचें पुढें चांगलें होण्याचा पाया ह्मटला ह्मणजे त्यांणी लहानपणापासून शाळेंत जावें हा होय. याजकरितां लहान मुलांस लहानपणापासून (दोन वर्षांपासून सहावर्षांपर्यंत) सर्व लोकांनीं शाळेंत पाठविलें तर तेणेंकरून त्यांस मग मोठें सुख प्राप्त होईल. लहानपणापासून मुलांस शाळेंत पाठविल्यानें केवढें हित आहे हें बहुतकरून सर्व सुधारलेल्या देशांतलि लोकांस माहीत आहे; ह्मणून तें येथें सांगण्याची गरज नाहीं.

**प्रकरण ७ वें समाप्त.**

# प्रकरण ८ वें.

---

## सासरीं वागणूक.

### श्लोक

वत्से होतिस धाकुटीचिमकुली दुग्धें तुला पोशिलें,
प्रेमानें लडिवाळिलें निशिदिनीं जीवापरी पाळिलें ।
वर्षें द्वादश झालिशी उपवरा आतां प्रिये कोमले,
सत्पात्रीं तुज अर्पिणें उचित हें मातापित्या प्रेमले ॥१॥

सुज्ञानी कुलवान् सुधी सुहृदयीं सुस्निग्ध ऐसा पिता,
माता सौम्य कृपाळु वत्सलसती धर्मी ही तैशी रता।
हें दंपत्य सुभाग्यवान् जनन दे ज्यातें असा नोवरा,
पाहोनी तुज अर्पिली समय हो भाग्योदयाचा बरा ॥२॥

आनंदें पतिच्या गृहासि स्वशुरश्वश्रूचिया आश्रया,
जावेंत्वां तनये न खेद करणें स्त्री जन्मली जावया ।
मातावंधुपितावियोग न गणीं सर्वांम्र जाणीं पती,
प्रेमाची सकला सुशीलवतितूं तेथें करीं संगती ॥३॥

भर्त्याच्या कुशलींच जागृत असें आज्ञा तयाची मनीं,
जेणें होइल रोष तें न करणें ठेवीं सदां हें मनीं।
सत्कार्यीं पतिसी सहाय करि तूं धर्मानुकुला सुते,
राहें साधित कांतभक्तिप्रभुची मुक्तीसि सोपान ते ॥४॥

ठेवीं संतत सौम्य वृत्तिविनयें शोभा असे स्त्रीजनीं,
सौजन्यें मित भाषणें मृदुपणें वर्ते सदां नंदिनी ।

कन्या वरयते रूपं । माता वित्तं पिता श्रुतं ॥
बांधवाः कुलमिच्छन्ति । मिष्टान्नमितरेजनाः ॥१॥

लहानपणीं मुलीला नवरा कसा पाहिजे म्हणून विचारलें तर चांगला गोरागोमटा, सुरेख हवा असें ती म्हणते. कारण ज्या प्रमाणें सुंदर स्त्रियांकडे पुरुषांचें, तद्वतच सुंदर पुरुषांकडे स्त्रियांचें मन स्वभावतः ओढतें. आतां स्त्रियांचे नुसत्या रूपाकडे लक्ष देणें योग्य नाहीं, कारण मनुष्याला मुख्य भूषण म्हटलें म्हणजे सद्गुण होय. परंतु सुंदरपणा हा दृष्टिरम्यतेचा एक मुख्य भाग असल्यामुळें जनांचें चित्त तिकडे लागणें साहजिक आहे. सद्गुण आणि सुशीलपणा हीं अनुभवांतीं कळतात. आणि यामुळेंच स्त्रियांना अज्ञानपणामध्येंही समजण्याजोगा जो मुख्य भाग तेवढा आपले पतीचे अंगीं असावा असें वाटतें. हीं गोष्ट कन्येची झाली. आतां तिची आई असते तिला वाटतें कीं, आपल्यास मिळणारे सोयरे चांगले सधन सुखी असून मुलीचे आंगावर चार ठळक ठळक डागडागिणे पडतील अशी सोय झाली पाहिजे. बापाला असें वाटतें कीं ज्यांच्याशीं आपल्याला सोयरीक करावयाची ते चांगले अब्रूदार व लौकिकवान असावे ह्मणजे आपल्याला भूषण आहे. मुलीचे बंधूंना असें वाटतें कीं, आपल्याला मेहुणे चांगले कुळांतले, हौशी, व रंगेली असावे म्हणजे बरी बहार

होईल. ही गोष्ट मुलीच्या मुख्य आप्तांची झाली. यांखेरीज ज्या आत्या, मावशा, भावजई, आणि इतर त्यांस लुगडीं, चोळ्या, नारळ व चमचमीत घीशकर झोडण्यास मिळाली ह्मणजे तीं सर्व होळीच्या होळकरांप्रमाणें एकत्र होऊन कार्य आटोपतांच चोहोंकडे पळून जातात.

मुलीकडल्या पक्षाचा सर्व झोंक जरी वरच्या सारखाच असतो, तथापि मुलाचे आईच्या एकंदर वातवेतांत व विचारांत आणि मुलीच्या आईच्या विचारांत जमीनअस्मानाचें अंतर असतें. ह्मणजे मुलीचे आईला—हुंडी पटवायाचा प्रसंग असेल तर तो खेरीज करून बाकीचे प्रसंगीं—केवळ मुलीचे कल्याणाचीच विशेष कळकळ असते. तथापि हें खरें कीं जर भरपूर डागिणे अंगावर पडतात असें वाटलें तर मग मुख्य सुखाकडे ती फारसें लक्ष पोंचविणार नाहीं. परंतु आपला थाटमाट व वातवेत कसा राहील याची तिला विशेषशी पर्वा नसते. कारण प्रस्तुतचे विवाह समारभांत मुलीकडील पक्षाचा एकंदर मान कमी असून मुलीचे आईला तर पुष्कळच ताबेदारी सोसावयाची असते. तेव्हां सरासरी विहीण फारशी खाष्ट न मिळतां फारशा रुसण्या फुगण्या वांचून एकदां कार्य तडीस जावें इतकेंच ती इच्छित असते. पण मुलाचे आईचा प्रकार तसा

नाहीं. लग्नांतील पुष्कळ सोहाळे व ऐश्वर्य भोगण्याचा तिला अधिकार असतो. यामुळें मुलाची आई प्रथम सोयरें कसें आहे, आपले मानापानाला विहीण कितपत जपेल, रासन्हाणीं वगैरे बातबेत ठीक उतरेल किंवा नाहीं, आपण रुसून बसलों असतां नीट समजावणी करून विहीण आपल्यापुढें नाक घांशील कीं नाहीं, पायघड्यांचा थाट जमेल कीं नाहीं इत्यादि भिकार गोष्टींचीच मुलाचे आईला मोठी पंचाईत पडलेली असते. आणि वरील थाटांत कांहीं कमी होईल, याकरितां त्याजबद्दल आगाऊ ठराव करावे लागतात. हे सर्व बातबेत ठीक असले तर मग मुलीमध्यें जरी कांहीं गोम असली तथापि तिकडे कोणी विशेषसें लक्ष देत नाहीं. खेरीज वर सांगितल्याप्रमाणें जरी कितीही ठराव झाले तथापि लग्नांत शेवटीं रुसवा होऊन विहिणीविहिणींचे व होतां होतां व्याहाव्याहांचे तंटे होऊन वैमनस्याची सुरवात होते. परंतु चालू कार्यांत विघ्न होऊं नये ह्मणून जमलेले वऱ्हाडी त्या उभयतांची कशीतरी एकदां समजावणी करून मिष्टान्नाचा लाभ जाऊं देत नाहींत. पण शेवटीं वरील सोयऱ्यांमध्यें जें एकदां वितुष्ट पडतें तें बहुधा पुढें नवरानवरीच्या व त्या उभय कुटुंबांतील सर्व मनुष्यांचे सुखाचें वाटोळें करण्यास कारण होतें.

विवाहसमारंभ आटोपला ह्मणजे मुलीनें सासरीं

कसें वागावें, याचा तिचे आईनें तिला उपदेश करायाचा किंवा मुलाचे आईनें आपले सुनेस सद्वर्तनाचा मार्ग दाखवावयाचा तो एकीकडे राहून मुलाची आई विहिणीवरील सर्व राग नंतर सुनेवर काढण्याची सुरवात करते. ज्या गोष्टी बद्दल मुलीचे आईला फार वाईट वाटेल अशा गोष्टींचे संबंधानें नेहमीं खंवचट बोलणीं त्या मुलीचे समक्ष बोलावयाचीं, तिच्या खाण्यापिण्याची हेळसांड करावयाची, तिला नाहीं, नाहीं, तीं कामें सांगावयाचीं ती वयांत आल्यावर तिचे संगतीं नवरा चांगल्या रीतीनें वागून आपला सूड उगवण्यांत कमीपणा येईल, असें समजून मुलाचे मनांत जेणें करून तिजविषयीं अप्रीति उत्पन्न होईल अशा गोष्टी हमेषा त्यास सांगावयाच्या, अशा जाचणुकीनें ती मुलगी अगदीं कंटाळून व फार त्रासून जाते. तिला सासऱ्याहून कधीं एकदां माहेरीं जाईन असें होतें. पण सासूबाई तिला कोठल्या जाऊं द्यावयाला ? कारण सुनेच्या संबंधानें तिला सार्वभौमसत्ता प्राप्त झालेली असते. पुढें मुलगी फार कंटाळली असें तिच्या आईबापांस वाटलें व तिला नेहमीं होणारा सासुरवास त्यांचे कानीं आला ह्मणजे मुलीस आणण्याकरितां ते बोलावणें पाठवितात पण सासूबाई कोठल्या एका बोलावण्यानें मुलीस पाठवावयाला ! ! इतकेंच नव्हे पण सनेजवळ वाचलेली कर्मकटकट पुनः त्या बोलावणेकऱ्यास देखील

सांगण्याची सुरवात होते. मिळून अशीं कित्येक बोलावणीं परत गेल्यावर पुढें मुलीचा बाप किंवा आई यांस समक्ष येण्याचा प्रसंग येतो. आई आल्यानंतर पुनः विहिणीची कर्मकटकट तीच. शेवटीं ती बिचारी आपल्या मुलीची कशी तरी नीट नांदणूक व्हावी ह्मणून विहिणीबाईंची समजूत घालून एकदां मुलीला घेऊन जाते. पुढें मुलगी घरीं गेल्यानंतर तिच्या आईबापांनीं तरी झाले गोष्टीकडे दुर्लक्ष करून स्वस्थ बसावें; पण तेंही नाहीं. मुलीस झालेल्या सासुरवासाची काहाणी सांगण्यास तींच उलट तिला उत्तेजन देतात, आणि मुलीला तरी प्रीतीचा अनादि ओढा माहेरचाच असल्यामुळें तीही सर्व इत्थंभूत हकीकत सांगण्याची सुरवात करिते. कारण, अगोदर तिचे मनांत तें असून खेरीज आईबापांकडून उत्तेजनही मिळतें. मग काय! घडलेले हकीकतीस आणखीं तिखटमीठ लावून ती सांगते. जगांत असा मनुष्य विरळा मिळेल कीं, ज्यास मर्मभेदक भाषण व निंदा सहन होईल. तशांतून ऐकींव गोष्टीवरून परस्परांविषयीं वैरभाव मनांत ठेवणें हा अशिक्षित स्त्रियांचा मोठाच दुर्गुण आहे. एखाद्या बाईस सहज जर कोणीं ह्मटलें कीं, तुमची शेजारीण तुह्मांला कज्जेदलाल ह्मणते असें माझे मैत्रिणीला तिची शेजारीण सांगत होती असें ती माझे जवळ बोलली, तर एवढ्या

कर्णोपकर्णी ऐकलेल्या गोष्टीवर विश्वास ठेऊन जरी शेजारणीशीं तिचें सख्य असलें, तरी देखील तें या निराधार व ऐकींव गप्पे वरून सर्व फुकट जाऊन ती मनांत मोठा रोष धरून मुद्दाम होऊन त्या शेजारणीशीं तंटा करण्यास जाईल. आतां सर्वच स्त्रिया अशा तऱ्हेच्या कज्जेदलाल असतात असें आमचें ह्मणणें नाहीं, परंतु वरील प्रकारच्या स्त्रियांची संख्या एकंदरींत बरीच, किंबहुना, शेकडा नव्याण्णव ह्मणण्या सारखी निघेल. याचें कारण अशिक्षितपणा व अज्ञान होय. आतां स्त्रियांस आह्मीं जो दोष दिला तशा प्रकारचे गुण पुरुषांतही आढळतात, हें येथें सांगणें रास्त आहे. कारण, एकतर्फी लिहिण्यानें लेखाचें महत्व कमी होतें, असें एका विद्वानाचें ह्मणणें आहे. स्त्रियांचे दुर्गुणांचें निदर्शन करतांना पुरुषांचे दुर्गुणही जनापुढें मांडून त्या परस्परांतील न्यूनाधिकपणा दाखविला पाहिजे. असो, स्त्रियांप्रमाणेंच पुरुषांमध्येंही प्रकृत दुर्गुण असतो ह्मणून जें आह्मीं वर ह्मटलें आहे, तें जरी खरें आहे, तथापि त्या विषयीं स्त्रीपुरुषांचीं मनें ताडून पाहिलीं असतां जमीन अस्मानाचें अंतर दृष्टीस पडेल. ह्मणजे वरील दुर्गुण ज्यांचे ठिकाणीं आहेत अशी स्त्रियांची संख्या जर ९९ मिळाली, तर पुरुषांची फार झाल्यास पांच मिळेल. याचें कारण सुशिक्षा होय. तशांतून सोयरगतीमध्यें तर स्त्रियांच्या मनांत जो द्वेषभाव

लज्जाशील असें सदांस्मितवनी कोपासि त्यागुनियां,
सेवीं आप्तजनासि किंकरिं सुते ठेवीं सुशीले दया ॥५॥

एखादें राज्य काबीज केल्यावर त्या राज्यांतील प्रजेशीं ज्याप्रमाणें राजाला वागावें लागतें, त्याप्रमाणेंच, किंबहुना त्याहीपेक्षां जास्त सौम्यपणानें, व शहाणपणानें आणि प्रेमानें मुलीला सासरीं वागावें लागतें. संसार हें एक लहानसें राज्यच आहे. तेव्हां मुलीच्या आईबापांनीं आपल्या विवाहित कन्येच्या हातीं सासरची पूर्ण सत्ता आल्यानंतर त्या सत्तेची तिला योग्य व्यवस्था करतां येण्याविषयीं काळजी वाहणें व उपदेश करणें अवश्य आहे. मुलीला सासरीं पाठविणें हें आईबापांना दुःसह असून जन्मापासून ममतेनें व लडिवाळपणानें वागविणाऱ्या आईबापांना सोडून परगृहीं एकटें निघून जाणें हें मुलीलाही फार दुःसह आहे. परंतु सृष्टिक्रमा प्रमाणें ही गोष्ट अवश्य असल्यामुळें मोठमोठ्या सार्वभौम राजांनींही आपल्या लाडक्या कन्या सुशील व विद्वान अशा गरीब मुलांच्या स्वाधीन करून दूरदेशांतील पर्णकुटींत राहण्याकरितांही पाठवून दिल्याचीं इतिहासांत उदाहरणें आहेत. तेव्हां ज्या ठिकाणीं कांहीं ओळख देखील नाहीं अशा घरीं राहून तेथील लहानापासून तों थोरापर्यंत सर्व मनुष्यांची प्रीति संपादन करणें आणि पतीस अंकित करून आपली त्या ठिकाणीं छाप

ठेवणें हें मुलीला किती दुर्घट आहे बरें ! या करितां मुलीनें सासरच्या सर्व मनुष्यांशीं प्रेमानें वागलें पाहिजे. सर्व तरुण आणि सुशील मुलींनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. पण जिला सासर ह्मणजे काय व नवरा ह्मणजे काय हें पुरतें समजत देखील नाहीं अशा अल्पवयी मुलीला हें दुःसाध्य होय. मुलीचें कल्याण करणें हें सर्वपरी तिच्या आईबापांच्या व सासूसासऱ्यांच्या हातीं आहे.

वृक्षावरील लतेप्रमाणें बाळपणापासून आईबापांस चिकटून राहिलेली जी लाडकी कन्या ती एकाएकीं त्यांस सोडून परक्या घरीं जाऊं लागली ह्मणजे त्यांस किती वाईट वाटेल हें सांगण्याची जरूर नाहीं. कारण त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेलीं हजारों कुटुंबें निघतील. तथापि हें मात्र खरें कीं आईबापांस जरी वाईट वाटलें तरी तें सर्व एकीकडे ठेऊन त्या परकीय परंतु कन्येच्या खरे मालकीच्या घरीं तिला कोणत्या रीतीनें सुख होईल, तिनें त्या ठिकाणीं कसें वर्तन ठेवावें, वगैरे गोष्टींची आईबापांनीं तरतूद करून ठेवणें हें त्यांचें मुख्य कर्तव्य होय. परंतु कित्येक आईबापांचें वाईट वाटणें, वृक्षानें स्वतः हातांत कुऱ्हाड घेऊन आपल्यावरील लतेस तोडून टाकावें आणि मग रडत बसावें अशाप्रकारचें असतें. हजार पांचशें रुपये घेऊन

एखाद्या ह्मातारड्याला मुलगी दिली ह्मणजे तो सर्वच प्रकार दुःखमय होतो. तेव्हां अशा प्रसंगीं वरील उपदेश कोणापुढें रडत बसावयाचा?

अलीकडे परकीयांचे संगतीनें स्त्रियांची स्वतंत्रता व त्यांचे अधिकार या संबंधानें कित्येक लोकांची जी थोडी चमत्कारिक समजूत पडून गेली आहे, तिचे योगानें वरील उपदेशांत कांहीं शंका घेण्यास एकदोन स्थळें मिळणार आहेत. याकरितां तीं कोणतीं हें सांगून त्याचें निराकारण प्रथम करूं. वरील स्थळें ह्मणजेः—वडिलांची शुश्रूषा करणें, सवतीशीं प्रियसखी प्रमाणें वागणें, व पतीनें अपमान केला असतांही त्याजवर न रागवणें. स्त्रिया जर स्वतंत्रता, अधिकार आणि योग्यता यांचे संबंधानें पुरुषांशीं समान आहेत, तर स्त्रियांनीं वरील प्रकारचें ताबेदारीचें काम कां करावें ? ही एक मोठी शंका घेण्याजोगी आहे. परंतु थोडा विचार केला तर या शंकेंत कांहीं अर्थ नाहीं, असें लक्षांत येईल. ज्याअर्थी स्त्रिया ह्या आपले आईबापांचे घरांतून निघून अगदीं अपरिचित अशा घरीं येऊन त्यांस तेथील सर्व मनुष्यांची प्रीति संपादावयाची असते, तेव्हां अशा मनुष्यांना आपल्यास आवडतें करून घेण्याविषयीं स्त्रियांना किती जपलें पाहिजे हें सांगावयास नको. तेव्हां स्त्रियांचे अंगीं अशाप्रकारची

बुद्धि उपजण्यास त्यांच्या आईबापांनीं लहानपणापासून त्यांस शिक्षण दिलें पाहिजे.

मुलीची सासरीं जी वर्तणूक असेत व सासरचीं माणसें त्या मुलीशीं ज्या रीतीनें वागतात, तिचे योगानें, अनेक कुटुंबांनीं एकमेकांवर प्रीति करावी, हा जो विवाहकर्माचा मुख्य फायदा तो एकीकडेस राहून उलट त्यांच्यांत कलागती व वैमनस्यें उत्पन्न होतात. आणि या वैमनस्यांचा असा भयंकर परिणाम होतो कीं, त्यापासून विवाहकार्यांतील मुख्य भाग जो नवरानवरीचें ऐक्य तें एकीकडे राहून त्या नूतन स्त्री पुरुषांचे जोड्यांतही अप्रीति व अविश्वास उत्पन्न होतो, आणि असें झाल्यानें घरामध्यें तंटे उपस्थित होऊन मोठें नामांकित व अब्रूदार घराणें असलें, तथापि थोड्या काळांत त्याची वाताहात लागून जाते. या कामीं दोघांकडूनही चुका होतात, ह्मणजे असें:—सर्वांपेक्षांही उभयपक्षांकडून विशेष ही चूक होते कीं, लग्न करावयाचें ह्मटलें ह्मणजे नवरानवरीचे फायद्याकडे, हिताकडे, व सुखाकडे बिलकुल लक्ष न देतां दोन्ही कुटुंबांतील माणसें आपल्या मर्जीप्रमाणें व लौकिकाप्रमाणें वागून सरासरी शोभे करितां नवरानवरी उभीं करितात. प्रस्तुतचे विवाहाचे प्रकारास अनुलक्षून एका कवीनें म्हटलें आहे:—

येतो तो विलक्षण असून खेरीज आपली निंदा किंवा कुटाळी मुलीचे तोंडांतून ऐकिल्यास मग तर बोलावयासच नको. क्षुल्लक कारणावरून तंट्यास येणें व तंटा सुरू झाला ह्मणजे उखाळ्या पाखाळ्या काढून नेहमीं मनांत आढी धरणें हे दुर्गुण स्त्रियांत बहुधा असतात हा अनुभव सर्वांस आहेच. मग मुलाचे आईकडे वरचढपणाचें नातें असून ती जर निंदा करील तर मुलीच्या आईला फार राग येईल हें उघड आहे. तेव्हां परस्परांमध्यें अशा रीतीनें वैमनस्य उत्पन्न होतें.

असो, अशा प्रकारें मुलीचे सासरच्या माणसांनीं तिच्या आईबापांची केलेली निंदा त्यांणीं मुलीचे तोंडांतून चांगली तिखटमीठ लावून ऐकिली ह्मणजे मुलीचे आईला जो संताप येतो व आपल्या विहिणीविषयीं तिचे मनांत जो द्वेष उत्पन्न होतो, त्या पुढें एखाद्या बादशहाचा आपले शत्रू विषयींचा द्वेष व रागही तुच्छ होय. असो, तिला किती जरी राग आला तथापि तिचे हातीं असा कांहीं अधिकार नसतो, कीं उठेल आणि मुलीचे सासूला किंवा तिच्या आप्तांला जाऊन शिक्षा करील !! परंतु उलट तिला आपला राग विहिणीस न दाखविण्याजोगा तिजवर तिचा धाक असतो. कारण ती विहिणीशीं तंटा बखेडा करील तर ती आपल्या मुलीला जास्तच जांच करील अशी धास्ती असते. आतां जर असा प्रकार

आहे, तर मुलीचे आईनें आपला सर्व राग गिळून जाऊन आपल्या मुलीची चांगली समजूत करून सासूजवळ तिला नीट रीतीनें वागण्याविषयीं उपदेश करावा. परंतु आरंभापासून सर्वच प्रकार अज्ञानपणाचा झालेला असतो त्यामुळें तिला ही अक्कल सुचणार कोठून? असो, याप्रमाणें मुलीचे तोंडांतुन निंदा ऐकिल्यानें पित्त खवळून जाऊन तिला सदुपदेश करण्याचें तर एकीकडेसच राहतें; परंतु उलट तिला सासूची अवज्ञा व अपमान करण्याविषयीं जास्त उत्तेजन मिळतें. सासूनें सांगितलेलें काम ऐकलें न ऐकलेंसें करावें; जावा, नणंदा इत्यादिकांशीं उद्धटपणानें वागावें, सर्वदां रागवलेलें असावें, आपल्याला होईल तेवढें काम करून जास्त त्रास होऊं लागल्यास करीत नाहीं ह्मणून साफ सांगावें. असा मुलीस उपदेश होऊं लागतो. मग काय!! मुलगी ती तर बोलून चालून अज्ञानच असते, आणि सासूच्या त्रासदायक वागविण्यानें ती कंटाळलेली असून खेरीज आईकडून अशी फूस मिळाल्यावर मग ती कमी कशाला करते.?

बायकांचे तोंडांत कोणतीही गोष्ट रहात नाहीं हें प्रसिद्ध आहे. याकामीं त्यांचा स्वभाव इतका उतावळा असतो कीं, त्यामुळें आपलें प्रत्यक्ष नुकसान होण्याजोगें आहे असें जरी त्यांस माहीत असलें तरी ती गोष्ट त्यांना पोटांत ठेवतां येत नाहीं. आपल्या

मुलीनें विहिणीची सांगितलेली कागाळी केव्हां एकदां शेजारणीस सांगेन अशी तिला घाई होऊन तिचें पोट फुगून जातें. असो, मुलीला वरील प्रकारचा उपदेश करतांच शेजारणीस तो सर्व कावा सांगण्याकरितां ती मुद्दाम आपले घरून उठून तिजकडे जाते. तेथें गेली ह्मणजे आमचे विहिणीनें असें करावें का ! तसें करावें का! ती अशीच आहे ! तिची मुलगी तशीच आहे ! ! इत्यादि प्रकारानें यथेच्छ निंदा करून घरीं येते, तेव्हां तिला समाधान वाटतें. पुढें तिच्या किंवा विहिणीच्या आप्तां पैकीं कोणी भेटल्यास हीच कर्म कटकट !! असो, याप्रमाणें मुलीचे आईचे तोंडांतून अशीं ज्याचे त्याचे जवळ मुक्ताफळें निघूं लागलीं ह्मणजे एकीनें दुसरी जवळ व दुसरीनें तिसरी जवळ अशी लावालावीची परंपरा लागून अखेरीस मुलीचे सासूचे कानांत तिच्या विहिणीनें केलेल्या निंदेचा पाऊस पडतो, मग काय! अगोरदच ती रुद्रावतारी झालेली असते. आणि त्यांत विहिणीचे अशा चेतवण्याची भर पडली ह्मणजे, ती आपलें उग्र भीमरूप प्रकट करून लगेच सुनेला बोलावण्यावर बोलावणीं पाठवून घेऊन येते. कारण त्या उग्रस्वरूपाचा प्रताप दाखविण्याला ठिकाण कायतें तेवढेंच असतें ! ! मुलीचे आईबापांवरचा सर्व राग काढावयाचा मुलीवरच. कारण मुलीचे आईला प्रत्यक्ष शिक्षा करण्याचा हिला

कांहींच अधिकार नसतो. मिळून या उभयतां विहि-णींचे कलागती पासून त्रास, दुःख, व सासुरवास काय तो त्या गरीब पोरीला.

मुलीचें लग्न होऊन ती सासरीं गेली ह्मणजे दिवसेंदिवस तिणें सासूसासऱ्यांला, इतर आप्तांला व आपल्या प्रिय पतीला सुख देऊन त्या सर्वांची प्रीति संपादन केली पाहिजे. तिणें माहेरचा सर्व ओढा सोडून देऊन सासर हें आपलें घर, सासूसासरे हे आपले सेव्य व आपला प्रियपति हेंच आपलें दैवत अशी आपली भावना ठेविली पाहिजे; याकरितां तिणें माहेरच्या मनुष्यांवरील ममता कमी करावी, किंवा त्यांचा समाचार घेऊं नये असा अर्थ नाहीं. तिणें यथा-शक्ति आपल्या आईबापांचा समाचार घेऊन त्यांस होईल तों पावेतों मदत करावी हें योग्य आहे. आणि हें सांग-ण्याची देखील गरज नाहीं, कारण आईबापांवर प्रीति करण्याची तिला जन्मापासूनच संवय असते. पण सास-रचे नुष्यांवर प्रीति करण्याचा तिला अभ्यास करावयाचा असतो. आतां मुलगी वयांत आल्यानंतर जगाच्या नियमाप्रमाणें ती आपले पतीवर जरी प्रीति करते, तथापि त्या प्रीतीमध्यें, व तिणें आपला व पतीचा संबंध ओळखून आणि आपले व पतीचे हक्क जाणून जी पतीवर प्रीति करावयाची तींत अंतर असतें.

लहानपणीं लग्न करण्याची चाल पडल्यामुळें

मुलीला आपला सासरच्या मनुष्यांशीं काय संबंध आहे हें समजतच नाहीं. आईबापांचे आग्रहास्तव व आपल्या बरोबरीच्या आणि लहान मोठ्या मैत्रिणींचें पाहूनच ती काय तें सासरीं राहण्याचें कबूल करते. वास्तविक सासरीं राहण्याची तिच्या अंतःकरणांत इच्छा नसल्यामुळें केवळ परकीं अशीं जीं सासरचीं मनुष्यें त्यांजवर तिणें प्रीति तरी कशी करावी? "आई गोड किंवा खाई गोड" अशी एक प्रचारांत ह्मण आहे. तिचा अर्थ असा कीं, मनुष्याची प्रीति आईवर किंवा आई प्रमाणेंच जो आपलें संगोपान करून ममता करतो व खाण्यापिण्याची काळजी घेतो, त्याजवर असते. आईवर तरी प्रीति असण्याचें कारण, ती जन्मापासून खाणें पिणें व लालन पालन करिते हें होय. ज्या मुलांची आई लहानपणीं मृत झाली असते तीं, आई प्रमाणेंच लालनपालन करणारी जी दाई वगैरे कोणी असते तिजवर अतिशय प्रीति करितात. किंवा आई जिवंत असतांही एखाद्या ममताळू मनुष्यावर मुलाची प्रीति असते. तेव्हां तात्पर्य काय कीं, प्रीति ही लालनपालनानें जडलेली असते. आतां मनुष्य ज्ञानी होऊन आपले स्वाधीन झालें ह्मणजे त्यास सारासार विचार समजूं लागून प्रीति कोठें ठेवावी व अप्रीति कोठें करावी हें जाणण्याची शक्ति

येते. परंतु हें समजण्यास ज्ञानाची गरज असते, पण हल्लीं ज्या वयामध्यें मुलांचीं लग्नें होतात त्या वयामध्यें त्यांस वरील ज्ञान असण्याचा संभव नाहीं. यामुळें नवरा नवरी हीं उभयतांही आपापले आई-बापांवर प्रीति करीत असून परस्परांचे संबंधाविषयीं अपरिचित व अज्ञानी असतात.

मुलीचें लग्न होऊन ती सासरीं गेली ह्मणजे ती अल्पवयी असल्यामुळें तिचा सर्व ओढा अर्थातच आईबापांकडे असणार. तेव्हां तिला तो विसर पडून तिणें आपणांवर प्रीति करावी म्हणून सासुसासऱ्यांनीं व त्यांतही मुख्यत्वें करून सासूनें विशेष काळजी घेतली पाहिजे. परंतु अलीकडे सुनबाई घरामध्यें येतांच तिजवर कामाकाजाचे व अदबीचे जे बोजे पडतात त्यांचे योगानें तिचे मनाला जास्त त्रास व दुःख होऊन सासरचे मनुष्यांविषयीं वाईट बुद्धि तिचे अंतःकरणांत उत्पन्न होते. सर्वांहून त्या मुलीवर विशेष प्रीति करणारा ह्मटला ह्मणजे काय तो पति होय. परंतु त्याणें तर तिच्याकडे पाहणें देखील अम-र्यादा समजली जात असल्यामुळें,आणि अज्ञान दशेमुळें तोही बायकोशीं आपलें कर्तव्य काय आहे हें जाणत नसल्यामुळें, तिकडून कांहीं उपयोग होत नाहीं. सासूचा प्रकार तर वर सांगितलाच आहे. आतां मुलीला कामकाज सांगण्याचे संबंधानें तिच्या सासू-

ला आह्मीं जो दोष दिला आहे त्यावरूनच कित्येकांस
असें वाटेल कीं, ही रीत फारच गैर आहे. सुनेला
पाटावर बसवून ठेवून सासूनें हमाला सारखें खपावें
हा कांहीं न्याय नाहीं. उलट सुनेनें सर्व कामकाज
आटोपून खेरीज सासूची व नवऱ्याची शुश्रूषा केली
पाहिजे. स्त्रीशिक्षणामुळें लहान मुलींस अशी फूस
मिळूं लागली ह्मणजे त्याचा परिणाम फारच वाईट
होईल, आणि नवरा जरी समजूतदार असला तथापि
त्याणेंही आपल्या आईचे मर्जी विरुद्ध बायकोला
डोक्यावर चढवून आईचा उपमर्द करणें हें योग्य
नाहीं. असें दूषण देण्यांत जे कित्येक भोळसर व
स्त्रीशिक्षणाविषयीं नाकें मुरडणारे गृहस्थ असतील ते
शेवटीं ह्मणूं लागतील कीं, आतां काळच फिरला.
स्त्रिया शहाण्या व्हाव्या ह्मणून लोकांना वाटूं लागून
त्यांजवर नवऱ्यांनीं प्रीति कशी करावी यावर निबंध
लिहिण्याचे प्रसंग येऊं लागले. आणि ह्याचा परि-
णाम काय तर सासूनें सुनेला काम सांगूं नये व न-
वऱ्यानें तर तिला डोईवरच चढवावें. इतक्या बेतावर
येऊन शेवटीं ते ह्मणतील कीं, आतां हें कलीचें
महात्म्यच असें आहे. दिवसेंदिवस बायकोचें महात्म्य
वाढून आईबापांची हेळसांडच होणार; ह्मणून साधु
संतांनीं भाकित करून ठेवलें आहे, त्याचा अनुभव

येणारच. कलियुगामध्यें लोकांची स्थिति कशी होईल या विषयीं तुकारानें एके ठिकाणीं ह्मटलें आहेः—

पलंगी बैसवूनी राणी । माते हातें आणवी पाणी ॥
स्त्रिये पाटवाची चोळी । माता अखंड चिंध्या गाळी॥

कित्येक ठिकाणीं वरील भोळसर लोकांची समजूत भलतीच होईल, त्याला आमचा कांहीं इलाज नाहीं. परंतु वास्तविक विचार केला असतां स्त्रीशिक्षणाविषयीं आमचें मुळींच तसें मत नसून स्त्रियेला पाटावर बसवून आईला काम करण्यास सांगावें असें आह्मीं प्रतिपादन केलें नाहीं. तथापि हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, मुलाचे आईबापांनीं आपल्या मुलाचें लग्न करून देऊन आयुष्यांतलि अतिशय महत्वाचा जो स्त्रीपुरुषांचा निकट संबंध तो जोडून दिल्यावर त्यांणीं त्या उभयतांमध्यें जेणेंकरून प्रीति व विश्वास उत्पन्न होईल त्या रीतीनें त्यांस वागविलें पाहिजे; नाहीं तर शेंकडों रुपये खर्च करून घरांत जी सून आणावयाची व जिला सर्व घरादाराची अधिकारिणी करावयाची, तिला नाखूष करून आपणांविषयीं व आपल्या संबंधी लोकांविषयीं तिच्या मनांत अप्रीति व अविश्वास उत्पन्न करणें अप्रशस्त होय. कामकाज करण्याकरितां व तावेदारी बजावण्या करितांच जर मनुष्य पाहिजे असेल, तर एकादा नोकर ठेवला

ह्मणजे तो जास्त हितावह होऊन आपला
हुकूम ज्यास्त काळजीनें ऐकेल. जर कदाचित्
तो आपल्या मर्जीविरुद्ध किंवा निष्काळजीनें
वागला तर त्यास एकदम हांकून देतां येईल. परंतु
सुनेचा प्रकार तसा नाहीं. तिजकडे कालांतरानें
घरदाराची सर्व मालकी सोंपवावयाची असते;
याजवरून तिच्या अंगीं दक्षता, सद्गुण, आणि
सासरच्या मनुष्यांविषयीं प्रेम कितपत असलें पाहिजे,
हें येथें सांगण्याची जरूर नाहीं. आणि तिच्या
अंगीं जर प्रेम नसलें तर जोंपर्यंत तिजवर सासूचा
दाब असून तिचें कांहीं चालत नसेल, तोंपर्यंत
ती कांहीं बोलणार नाहीं—परंतु जेव्हां संसारामध्यें
तिचें प्राबल्य वाढून सासूसासऱ्यादिक वडील माण-
सांस वृद्धापकालामुळें तिचे हाताखालीं दिवस काढ-
ण्याचा प्रसंग येईल, तेव्हां तीही पूर्वीचें सर्व उसनें
काढून घेतल्यावांचून राहणार नाहीं, अशा प्रकारचीं
शेंकडों उदाहरणें आपल्या अनुभवास येत आहेत. आतां
सासूनें सुनेचे हाल केले किंवा तिला सासुरवास केला
म्हणून सुनेनेंही तसेंच करावें हें कुलीन मुलींस योग्य
नाहीं खरें; परंतु सुनबाईचे मनास लहानपणापासून
सुशिक्षणाचा विटाळ देखील झालेला नसतो, यामुळें तें
संकुचित व सारासारविचाररहित झालेलें असतें. शि-
वाय येऊन जाऊन तिला सन्मार्गाचा कित्ता घे-

ण्यास कायती सासूबाईच. आणि तिचे तर तोंडांतून शिव्या, अपशब्द व कुचकट संभाषणें यांवांचून सुबोधवचनें कधींच ऐकिलेलीं नसतात, यामुळें सुनेसही पुढें तोच कित्ता लागतो. जी बाई आपल्या सुनांपासून आपल्यास सुख व्हावें असें इच्छीत असेल तिणें स्वतःच्या सासूला किंवा वडील माणसांला सुखी ठेवून व त्यांची आज्ञा पाळून पुढील संततीस कित्ता लावून दिला पाहिजे. तसें न करितां तीच जर आपल्या सासूचा छळवाद करीत असेल, तर तिची सूनही पुढें तोच कित्ता घेईल. सद्गुण संपन्न अशी मुलगी सासूचे दुर्गुण जरी पहात असली, तथापि ती त्यांचाच अंगीकार न करितां उलट आपल्या सुस्वभावानें सासूचेही दुर्गुण घालवून टाकिते. परंतु अशा स्त्रिया फार थोड्या, आणि तशांतून दुसरे असें कीं, मुलीला सन्मार्गास लावण्याचें ज्या आईबापांचें व सासुसासऱ्यांचें काम, त्यांणींच जर आपल्या कर्तव्याची हेळसांड केली तर मग त्या मुलीचें अंतःकरण तरी सुप्रकाशित व्हावें कसें ? आणि तिला जर सारासारविचार समजला नाहीं, तर तिजपासून सासू इत्यादिकांस सुख कोठून होईल ? या करितां विशेषें करून बायकांचीं अंतःकरण सुशिक्षित व सन्मार्गग्राहक असलीं म्हणजे त्यापासून कुटुंबामध्यें संतोष व ऐक्य यांची वृद्धि होऊन

परस्परांस परस्परां पासून अगणित सुखाचा लाभ होतो, व सुनेस “ परगृहवास अति दुःखद ” असें जें कवींनीं ह्मटलें आहे, त्याचा खरा अर्थ व अनुभव समजून ती सासरच्या मनुष्यांवर व संपत्तीवर मिळाविलेल्या स्वामित्वाचा पूर्ण उपभोग घेते.

---

समाप्त.

## ग्रंथकर्त्याची हकीकत
## व
## परमेश्वरप्रार्थना.

### पद—राग खमाज; ताल—धुमाळी.

पंचतुंड नररुंड मालधर या चा० (सं० शा०)

गणदेवा तूं दीनदयाला भक्तवत्सला तारिं मला ।
सफल माझिया यत्ना करुनी देईं तोषा सकलांला॥ ध्रु०
नरगुंदाभिध संस्थानीं तव दास असे हा अवतरला ।
गोविंदाचा पुत्र विनायक नाम असे या देहाला ॥
गणदेवा० ॥ आजवरीं मज शिक्षण दिधलें हुश तो जमखिंडीला । परि ग्रंथांच्या नादें करुनी सर्वहि गेलें विलयाला ॥ गणदेवा० ॥

### पद—राग भैरवी; ताल—दादरा.

काय मला भूल पडली या चा०

संपवुनी कठिण काज आस पुरविली ।
शंभुतनय तव पदिं ही कृति अर्पिली ॥ ध्रु०॥
श्वशुरगृहीं वर्तणूक मुलिंचि रचियली ।
श्वशुरवास द्वितियकृती हातिं धरियली ।
सुज्ञ जनां अभिरुचि ती यांचि लागली ।
म्हणुनी स्त्रीसंसारारशी[1] रचियली ।
चरणकृपें तुझिया ती सफल जाहली ।
देवा तव पदिं माझी बुद्धि गुंगली ॥ सं० ॥

---

1 स्त्रीसंसारआरशी—स्त्रीसंसारदर्पण.

**पद–राग भूपाळी; ताल–दादरा.**

किति तरि पहांटेची वेळ मला या चा०

प्रभौ अशी स्थिति माझी पाहुनियां तोष अति होतसे ।ध्रु.॥

तव पदिं मम भाव जरी ।
काय मला भय तें तरी ॥
सुख देउनी आजवरी ।
तारिलें असे ॥ १ ॥

बहु यत्न स्नेहापरी ।
पसरविले या भूवरी ।
जगमुखिं मम नाम करीं ।
आस हीच असे ॥ प्रभु० ॥ २ ॥

दहावा हा ग्रंथ करुनी ।
जन सेवा मनिं धरुनी
अर्पुनियां तव चरणीं ।
स्वस्थ मी असें ॥ प्रभू ॥ ३ ॥

विनायकराव गोविंद लिमये,
ग्रंथकार.

# इतिहास कौमुदी.

अथवा

## एतद्देशीय बड्या राजांचा खरा झालेला वृत्तांत.

या ग्रंथांत खालीं लिहिलेल्या संस्थानांचा इतिहास छापविणार आहों.

१ उदेपुर, २ जयपुर, ३ जोतपुर, ४ भरतपुर ५ विकानेर, ६ बासवाडा, ७ प्रतापगड, ८ डोंगरपुर, ९ किसनगड, १० धोलपुर, ११ अलवार, १२ बुंदी, १३ कोटा, १४ झालवार, १५ टोंक, १६ केरोली, १७ शिरोही, १८ जेसलफर, १९ रेवा, २० दतिया, २१ भोपाळ, २२ धार, २३ देवास, २४ जावरा, २५ पत्याला, २६ नाभा, २७ झिंद, २८ कपुरथळा, २९ भावलपुर, ३० कच्छ, ३१ सावतुर, ३२ सांवतवाडी, ३३ कोचिन, ३४ त्रावणकोर, ३५ म्हैसूर, ३६ काश्मीर, ३७ उर्वा किंवा तेहरी, ३८ ग्वॉल्हेर, ३९ निजामहैदराबाद, ४० बडोदें, ४१ इंदोर, ४२ कोल्हापुर, ४३ नेपाळ, ४४ लखनो, ४५ तंजावर.

या ग्रंथास वर्गणीदार होणें असल्यास आपलीं नांवें व वर्गणी मुंबई येथें इंदुप्रकाश व नेटिव ओपिनियन छापखान्यांत अगर खालील पत्यावर पाठवून द्यावी. अगाऊ वर्गणी टपाल खर्चासह २ रु. १२ आ. आहे. जुनअखेर ग्रंथ तयार होईल.

एन. एल. विनायकराव गोविंद.

पत्ता—कांदेवाडींत जगदीश्वर छापखाना मुंबई.